cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–५ | सोमवार दि.१५ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | ▪ पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### आरोग्यव्यवस्था रुग्णकेंद्री व्हावी

प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमातून सरकारी आरोग्य व्यवस्थेतील असुविधांचा पंचनामा अधूनमधून सुरु असतो. तरीही सरकारी रुग्णालयात रुग्णांची गर्दी आढळते. कारण आर्थिक परिस्थिती साधारण किंवा डळमळीत असलेल्या लोकांना त्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. असे लाखो लोक सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेकडे आशेने बघतात. तीच व्यवस्था त्यांना प्रसंगी आधार वाटते. मग ते आजार कोणत्याही ऋतूत उत्पन्न होणारे असोत. सध्याचे दिवस उष्णतेचे आहेत. उष्णतेच्या लाटा येतील असा हवामान खात्याचा अंदाज आहे.

### राज्यातील मोठ्या धरणांमधील पाणीसाठा ३२.७२ टक्क्यांवर

पुणेः गेल्या हंगामात पावसाने उसंत घेतल्यामुळे यंदा राज्यातील धरणांच्या जलाशयांमधील साठ्याची स्थिती फारशी चांगली नाही. राज्यातील अनेक मोठे, लघू आणि मध्यम प्रकल्पांमधील पाणीसाठ्यात घट होत आहे. राज्यातील मोठ्या धरणामधील पाणीसाठा रविवारी (ता.१४) ३२.७२ टक्क्यांवर आला असून मध्यम धरणांमध्ये ४०.०७ टक्के पाणीसाठा आहे. तर राज्यातील २५९६ लघु प्रकल्पांमध्ये ३१.५४ टक्केच उपयुक्त पाणीसाठी उरला आहे. या परिस्थितीमुळे यंदा पाणीप्रश्न गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# आगामी खरिपासाठी ‘महाबीज’ चा बीजोत्पादन कार्यक्रम जाहिर

## राज्यातील गावांनी सहभागी होण्याचे आवाहन

**अकोला । प्रतिनिधी**

**आगामी खरीप हंगामात महाबीजने बीजोत्पादन कार्यक्रम आरक्षण योजना राबवण्याचे जाहीर केले असून, राज्यातील शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बीजोत्पादन कार्यक्रम आरक्षण योजना ३० एप्रिल पर्यंत राबविण्यात येत आहे.**

महामंडळाकडून प्रत्येक बीजोत्पादन कार्यक्रम आरक्षण योजनेस १९९२–९३ च्या खरीप हंगामापासून वाढता प्रतिसाद आहे. या योजनेमुळे बीजोत्पादक व बीजोत्पादन गावांची निवड करण्यास मदत होऊन आरक्षित बीजोत्पादन कार्यक्रमासाठी वेळेवर पायाभूत बियाणे पुरवठा करणे सुद्धा फायदेशीर झाले आहे. त्याच उद्देशाने महामंडळाने या खरीप हंगामात प्रमाणित तथा पायाभूत बीजोत्पादन कार्यक्रम आरक्षण योजना राबवली जात आहे. कमीत कमी गावांमध्ये जास्तीत जास्त क्षेत्रावर तथा बीज प्रक्रिया केंद्रानजीकच्या गांवामध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन आहे. बीजोत्पादन कार्यक्रम आरक्षण योजनेमध्ये ‘गाव’ हा प्रमुख घटक गृहीत धरलेला असून, १०० टक्के क्षेत्र




तपासणी करून, तसेच गाव संख्या कमी असल्यामुळे बीजोत्पादकांना वेळोवेळी आवश्यक ते संपूर्ण तांत्रिक मार्गदर्शन करून उत्पादित बियाण्यांची उच्चतम गुणवत्ता राखणे सोईचे होईल, हा उद्देश ठेवण्यात आला. एका गावामध्ये पीक, वाण, दर्जा मिळून भाजीपाला पिकांसह कमीत कमी ५० एकर बीजोत्पादन कार्यक्रम आयोजित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. प्रक्रिया, योग्य कच्चे बियाणे, लॉट साइजकरिता तूर, तीळ, ज्यूट वगळून इतर पिकांचा ३ एकरांपेक्षा कमी कार्यक्रम न राबविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. जास्तीत जास्त बीज गुणांक (एसएमआर) प्राप्त होण्याच्या दृष्टीने संपूर्ण पायाभूत बीजोत्पादन कार्यक्रम सुरुवातीलाच योग्य बीजोत्पादक व योग्य क्षेत्राची निवड करून एकाच तालुक्यात राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान तथा तृणधान्य कडधान्याचे उत्पादन वाढ ◀◀ पान २ वर

### बीजोत्पादन कार्यक्रमात ‘गाव’ प्रमुख घटक

शंभर रुपये प्रति एकराप्रमाणे आरक्षण रक्कम भरून शेतकऱ्यांना बीजोत्पादन कार्यक्रम आरक्षण योजनेमध्ये सहभागी होता येईल. ‘बीज ग्राम योजने’अंतर्गत महाबीज बीजोत्पादन कार्यक्रमामध्ये ‘गाव’ हा प्रमुख घटक गृहीत असून एकाच गावात जास्तीत जास्त बीजोत्पादन कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे नियोजन आहे. खरीप २०२४–२५ बीजोत्पादन कार्यकम बीज प्रक्रिया केंद्राच्या ५० किलोमीटरच्या परिसरातील गावामध्ये प्राधान्यक्रमाने राबवला जाईल.

# बाबासाहेबांचे संविधान वाचवणे हाच आमचा उद्देश–खर्गे

**नागपूर । प्रतिनिधी**

**महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दर्शन करण्यासाठी मी पवित्र दीक्षाभूमी येथे आलो आहे. डॉ. बाबासाहेबांचे संविधान वाचवणे हाच आमचा उद्देश असल्याचे प्रतिपादन काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केले. संसदेमध्ये सकाळीच मी जयंती साजरी करून थेट नागपूरमध्ये आलो आहे. ही बाबासाहेबांची कर्मभूमी आहे आणि बाबासाहेबांनी देशाला संविधान दिले आहे. त्याच वाटेवर सर्व लोक चालावेत हीच आमची अपेक्षा आहे, असे दीक्षाभूमीला अभिवादन केल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.**

बाबासाहेबांच्या संविधानाला वाचवणे आणि लोकशाहीला वाचवणे हाच आमचा उद्देश आहे. यामुळे देशातील सामान्य लोकांना सामाजिक आणि आर्थिक न्याय



मिळेल. संविधान वाचवण्यासाठी आम्ही लढत आहोत आणि लढत राहू असे खर्गे म्हणाले. भाजपाचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला आहे, यासंदर्भात छेडले असता ही चर्चा करण्याची ही जागा नाही. या स्थळाला मी धार्मिक स्थळ मानतो, त्यामुळे या विषयावर मी पब्लिक मीटिंगमध्ये त्यांचा जाहीरनामा आणि आमचा जाहीरनामा यासंदर्भात सविस्तर बोलेन असेही मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे बाळासाहेब थोरात आदी उपस्थित होते. नागपुरातील गोळीबार ◀◀ पान २ वर

# रशियाचे पुतीन आणि नरेंद्र मोदी यात काहीही फरक नाही

## शरद पवार यांचा भाजपावर हल्ला

**अकलूज । वृतसंस्था**

**लोकशाही असणाऱ्या देशात सत्ताधारी पक्षाप्रमाणेच विरोधकही तितकेच महत्त्वाचे असतात. मात्र एकाही विरोधकाला मत देऊ नका असे सांगणे म्हणजे रशियाचे पुतीन आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यात काहीही फरक नाही असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी अकलूजमध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना केला आहे.**

शरद पवार म्हणाले की, माढा लोकसभा मतदारसंघात धैर्यशील मोहिते पाटील यांनी निवडणूक लढवावी अशी आमच्या सगळ्यांची इच्छा होती.



लोकसभेसाठी अर्ज भरण्याची तारीख १६ एप्रिल आहे. सोलापुरात दोन्ही उमेदवार लोकसभा निवडणुकीसाठी अर्ज भरतील असे शरद पवार यांनी सांगितले. याचबरोबर शिवसेनेचे करमाळ्याचे माजी आमदार नारायण आबा पाटील येत्या २६ एप्रिल रोजी पक्षात प्रवेश करणार आहेत असेही यावेळी त्यांनी सांगितले. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, भाजपाने जाहीरनाम्यात जी काही आश्वासने दिली आहेत. त्यावर आता भाष्य करणे योग्य नाही. कारण अनेक प्रश्नांवर आश्वासे देणे आणि त्याची अंमलबजावणी न करणे हे भाजपाचे वैशिष्ट्य आहे. ईडी, सीबीआय या यंत्रणांचा गैरवापर करणे हे मोदींचे सूत्र आहे. मोदी लोकशाही उद्ध्वस्त करून हुकूमशाहीकडे जात आहेत. एकही विरोधक निवडून येऊ देऊ नका असे ते म्हणतात. लोकशाहीत सत्ताधारी पक्ष जसा तसाच विरोधी पक्षही महत्वाचा असतो. एकही माणूस निवडून येऊ देऊ नका ◀◀ पान २ वर

### ‟ धैर्यशील मोहिते–पाटील यांच्या हाती अखेर तुतारी

धैर्यशील मोहिते–पाटील यांनी रविवारी (दि.१४) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी शरद पवार गटात जाहीर प्रवेश केला. मागील अनेक दिवसांपासून धैर्यशील मोहिते–पाटील हे शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा होत्या. अखेर त्यांनी आज राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यांना माढ्यातून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. १६ एप्रिल रोजी माढ्यातून ते उमेदवारी अर्ज भरणार आहेत.

# यानंतर घराबाहेर गोळ्या झाडणार नाही

## अनमोल बिश्नोईचा सलमानला इशारा, गोळीबाराची जबाबदारी स्वीकारली

**मुंबई । प्रतिनिधी**

**लॉरेन्स बिश्नोईचा अमेरिकेत असलेला गँगस्टर भाऊ अनमोल बिश्नोई याने सोशल मीडियावर पोस्ट लिहिली आहे. यात त्याने अभिनेता सलमान खानच्या घराबाहेर झालेल्या गोळीबाराची जबाबदारी स्वीकारली आहे.**

अनमोल बिश्नोई यांने आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे की, ओम जय श्री राम, जय गुरुजी जांभेश्वर, जय गुरु दयानंद सरस्वती, जय भारत आम्हाला शांतता हवी आहे, दडपशाहीविरोधात निर्णय



युद्धातून घेतला गेला. तर युद्ध योग्य आहे. सलमान खान, आम्ही तुम्हाला ट्रेलर दाखवण्यासाठी हे केले आहे. जेणेकरून तुम्हाला आमची ताकद समजेल. हा पहिला आणि शेवटचा इशारा आहे. यानंतर घराबाहेर गोळ्या झाडल्या जाणार नाहीत. दाऊद इब्राहिम आणि छोटा शकील ज्यांना तुम्ही देव मानता त्यांच्या नावाने आम्ही दोन प्राणी पाळले आहेत. आपल्याला जास्त बोलायची सवय नाही. लॉरेन्स बिश्नोई ग्रुप, गोल्डी ब्रार ग्रुप, कला जथेडी ग्रुप, रोहित गोदरा ग्रुप. सलमान खानला काही दिवसांपासून गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईकडून अनेक धमक्या येत आहेत. ◀◀ पान २ वर

# सरबजीत सिंग यांच्या मारेकऱ्याची हत्या

**कराची । प्रतिनिधी**

**पाकिस्तानच्या कारागृहात भारतीय नागरिक सरबजीत सिंग यांची हत्या प्रकरणातील आरोपी आमीर सरफराज याची लाहोरमध्ये अज्ञातांनी गोळ्या झाडून हत्या केली आहे.**



पाकिस्तानने हेरगिरीच्या आरोपाखाली सबरजीत सिंग यांना अटक केली होती. यानंतर त्यांना तुरुंगात टाकले. येथे त्यांचा अतोनात छळ करण्यात आला होता. ते १९९० पासून पाकिस्तानच्या कोट लखपत तुरुंगात होते. त्यांच्या सुटकेसाठी भारत सरकारने प्रयत्न केले मात्र पाकिस्तानने त्यांच्यावरील आरोप कायम ठेवले. सरबजीत सिंग यांची २०१३ मध्ये पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयच्या सूचनेवरून सरफराजनेच हत्या केली होती. लाहोर येथील कारागृहात अंडरवर्ल्ड डॉन अमीर सरफराज याची रविवारी हत्या करण्यात आली. सरबजीत सिंग यांचे भिखीविंड हे गाव पंजाबमधील तरनतारन जिल्ह्यात ◀◀ पान २ वर

# आष्टी मतदारसंघातून प्रीतमताई पेक्षा पंकजाताईंना जास्त मताधिक्य देण्यासाठी कामाला लागा–आ.आजबे

## आ.आजबे व माजी आ.धोंडे यांच्या उपस्थितीत दौलवडगाव येथे कार्यकर्ता मेळावा संपन्न

**आष्टी । पतिनिधी**

बीड लोकसभेच्या निवडणुकीत पंकजाताई गोपीनाथ मुंडे या विकासाची वाट धरून चालणाऱ्या उमेदवार आहेत त्यांना १०० टक्के मंत्रीपद मिळणार असल्याने विकास कामे खेचून आणण्यासाठी आपण सर्वांनी त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. कार्यकर्त्यांना ज्या अडचणी येथील त्या कार्यकर्त्यांनी तात्काळ सांगाव्यात त्या दूर केल्या जातील. बीड जिल्ह्याचे नाव देशात गाजवण्यासाठी पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना प्रीतमताई मुंडे यांच्या पेक्षा जास्त मतांनी निवडून द्या, असे आवाहन



आमदार बाळासाहेब आजबे यांनी केले तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे देशाचे नाव जगात झाले आहे. शेतीमध्ये हरितक्रांती घडवून मुबलक प्रमाणात उत्पन्न वाढ झाली आहे. या सर्वांचा विचार करता आपल्या बीड जिल्ह्याच्या विकासासाठी आपल्या हक्काच्या खासदार पंकजाताईंना निवडून द्यावे, असे आवाहन यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले.

बीड लोकसभा मतदारसंघाच्या भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ दौलावडगाव जिल्हा परिषद गटातील महायुतीच्या कार्यकर्त्यांची बैठक रविवार दि. १४ एप्रिल रोजी आ. बाळासाहेब आजबे व माजी आ. भीमराव धोंडे यांच्या प्रमुख उपस्थित ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१३ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : २४.०० क्विंटल | २,६७२ | ३,१०० | २,८६४ |
| ज्वारी/हायब्रिड :१६५.०० क्विंटल | १,७५० | ३,७०० | २,६२९ |
| मूग :०.५० क्विंटल | ९,२०१ | ९,२०१ | ९,२०१ |
| तूर : १६.५० क्विंटल | १०,७२१ | १०,७२१ | १०,७२१ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: ५.०० क्विंटल | २,६०० | २,६०० | २,६० |
| चिंचोका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४०० | २,४०० | २,४०० |
| सोयाबीन: १८५.५० क्विंटल | ४,६६० | ४,७११ | ४,६९० |
| हरभरा: १३.०० क्विंटल | ५,३०० | ५,६४० | ५,५२० |

# महामानवास अभिवादन !

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे जनसागर उसळला

- अभिवादन रॅलीसह मिरवणूकीने बीड शहराचे वेधले लक्ष
- जिल्हाभर विविध उपक्रम राबवून बाबासाहेबांना अभिवादन



**बीड । प्रतिनिधी**

**भारतीय संविधानाचे शिल्पकार, मानव जातीचे उद्धारकर्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी रविवार (दि.१४) रोजी बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे जनसागर उसळला.यावेळी पूज्य भंते अन् भारतीय बौद्ध महासभेकडून त्रिशरण, पंचशील ग्रहण करुन देत, पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करुन महामानवास त्यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही समता सैनिक दलाकडून अभिवादनपर सलामी देण्यात आली. यावेळी भिमसागराची गर्दी उसळली होती.**

जातीव्यवस्थेने अस्पृश्य समाजाला दिलेल्या गुलामीच्या बेड्या तोडताना समाज परिवर्तनासोबत सशक्त भारताच्या निर्मितीसाठी दिशा दाखवण्याचे महान काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. बाबासाहेबांनी केलेल्या उत्तुंग कार्याने देशातील कोट्यवधी नागरिकांच्या प्रगतीचा, समान संधीचा मार्ग मोकळा केला. त्याची आठवण ठेवून १४ एप्रिल रोजी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी लाखोंचा जनसागर उसळतो. त्या अनुषंगाने बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे अभिवादनासाठी अलोट गर्दी करुन भिम अनुयायांनी बाबासाहेबांना वंदन केले. दरम्यान सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा इथपर्यंत अभिवादन रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत शहरातील विविध भागातील जयंती रॅलींचा सहभाग होता.रॅलीमध्ये पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करुन आंबेडकरी जनता सहभागी झाली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या घोषणांनी बीड शहराचे लक्ष वेधून घेतले होते.यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती,भारतीय बौद्ध महासभा,समता सैनिक दल, जिल्हा प्रशासन, आजी–माजी आमदार, विविध पक्षाचे पदाधिकारी यांच्यासह बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी भीमसागर लोटला होता. ◀◀ पान २ वर

# नंदुरबारची मिरची, आमचूर पावडरला जीआय मानांकन



**नंदुरबार । प्रतिनिधी**

**नंदुरबारची प्रसिद्ध मिरची पावडर आणि सातपुड्यात तयार करण्यात येणारी आमचूर पावडर यांना जीआय मानांकन प्राप्त झाले आहे. यामुळे या दोन्ही वस्तूंना जागतिक पातळीवर मान्यता मिळाली आहे.**

नंदुरबार जिल्ह्यात मिरचीचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते. दर हंगामात तीन ते साडेतीन लाख क्विंटल मिरची येथे खरेदी होते. त्यावर प्रक्रिया करून मिरची पावडर तयार केली जाते. त्यालाही देशभरात मागणी आहे. याशिवाय आंब्याच्या सिझनमध्ये सातपुड्यात विशेषतः धडगाव व अक्कलकुवा तालुक्यात आमचूरचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते. त्यापासून पावडरदेखील तयार केली जाते. त्यालाही ◀◀ पान २ वर

cmyk

cmyk



## अग्रलेख

# आरोग्यव्यवस्था रुग्णकेंद्री व्हावी

प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमातून सरकारी आरोग्य व्यवस्थेतील असुविधांचा पंचनामा अधूनमधून सुरु असतो. तरीही सरकारी रुग्णालयात रुग्णांची गर्दी आढळते. कारण आर्थिक परिस्थिती साधारण किंवा डळमळीत असलेल्या लोकांना त्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. असे लाखो लोक सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेकडे आशेने बघतात. तीच व्यवस्था त्यांना प्रसंगी आधार वाटते. मग ते आजार कोणत्याही ऋतूत उत्पन्न होणारे असोत. सध्याचे दिवस उष्णतेचे आहेत. उष्णतेच्या लाटा येतील असा हवामान खात्याचा अंदाज आहे.

तापमानाच्या पाऱ्याने चाळीशी जरी ओलांडली तरी लाखो लोक उदरनिर्वाहासाठी घराबाहेर पडतात, अशा लोकांना उष्माघाताचा तडाखा बसू शकतो. उष्माघात लक्षातच नाही आला किंवा त्याच्या प्राथमिक लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास उष्माघात प्रसंगी जीवावर बेतू शकतो. राज्यातील सरकारी रुग्णलयांमध्ये स्वतंत्र उष्मघात कक्ष कार्यान्वित करण्यात आल्याचे सरकारने जाहीर केले आहे. इतर अनेक दीर्घ व्याधींवर देखील उपचार मिळावेत अशी गरजूंची अपेक्षा असते. उदाहरणार्थ भारतात कॅन्सर वेगाने वाढत असल्याची आकडेवारी प्रसिद्ध होते, अनेक जगातील अहवाल तसे निष्कर्ष मांडतात. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य अहवाल देखील वाढत्या रुग्णसंख्येकडे अंगुलीनिर्देश करताना आढळतो. प्राथमिक टप्प्यात लक्षणे लक्षात आली तर कॅन्सर बरा होऊ शकतो. तरी यावरचे उपचार कमालीचे महागडे असतात. नाशिकच्या संदर्भ रुग्णालयात अत्यंत अल्प दात किमोथेरपी केली जाणार असल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. राज्य सरकारने टाटा मेमोरियलशी तसा करार केल्याचे माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. या उपक्रमात गरजू रुग्णांची संख्या निश्चित असेल. दीडशे रुग्णांना तरी उपचार सुसह्य होऊ शकतील. असे उपक्रम सरकारी आरोग्य व्यवस्थेबद्दल विश्वास निर्माण करू शकतात. ही व्यवस्था प्रसंगी लोकांना आधार ठरू शकेल अशा आशा पल्लवित करू शकेल. लाखो लोक किरकोळ उपचारांसाठी सुद्धा या व्यवस्थेवर अवलंबून असतात. त्यांचाही विचार सरकारने प्राधान्याने करायला हवा. काही तक्रारींचे स्वरूप वर्षानुवर्षे बदलत नसावे का? डॉक्टर आणि आरोग्यसेवकांची शेकडो पदे रिक्त, डॉक्टरांच्या

सरकारी भरतीच्या जाहिरातींना प्रतिसाद नसणे, उच्चस्तरीय प्रशासकीय पदे रिक्त, उपचारास मदत करणारी यंत्रसामग्री बंद, ती सुरु असली तर ती चालवू शकतील अशा तंत्रज्ञांचा अभाव, डॉक्टरांची गैरहजेरी या त्यापैकीच काही तक्रारी. ज्याच्याशी रुग्णांना देणेघेणे असू शकेल का? त्यांना उपचार

व्यवस्थित मिळावेत एवढीच त्यांची अपेक्षा असते. त्यासाठी आरोग्यव्यवस्थेला मानवी चेहरा देण्याला आणि ती व्यवस्था रुग्णकेंद्री बनवणे गरजेचे आहे.

# सेवानिवृत्त अभियंता इनायततुल्ला बेग हे उमराह यात्रेवरून परतल्यानंतर आष्टी तालुका पत्रकार संघाच्यावतीने सत्कार

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी नगरपंचायतचे नगराध्यक्ष जिया बेग यांचे वडील माजी सेवानिवृत्त जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता इनायततुल्ला बेग यांनी नुकतीच बेग परिवारासोबत सौदी अरेबियातील मक्का येथील उमराह यात्रा पूर्ण केल्याबद्दल आष्टी तालुका पत्रकार संघाच्यावतीने त्यांचे अभिनंदन करत सत्कार केला होते.**

सौदी अरेबियातील मक्का येथे वार्षिक हज यात्रेवैतिरिक वर्षभरात पवित्र काबाचे दर्शन घेण्यासाठी उमराह यात्रेनिमित्त अनेक मुस्लिम बांधव जगभरासह देशांमधून यात्रेकरू दरवर्षी मक्का येथे जात असतात. इस्लाम धर्माच्या पाच तत्त्वांपैकी हज यात्रा एक तत्त्व आहे. शारीरिक आणि आर्थिकरीत्या सक्षम असणाऱ्या मुस्लिमांनी आयुष्यात एकदा तरी हज यात्रा केली पाहिजे, असे सांगितले जाते. जीवनात कळत-नकळत झालेले पाप धुऊन टाकणारा आणि अल्लाहच्या नजीक नेणारा एक आध्यात्मिक अनुभव म्हणून हज यात्रेबरोबर उमराह यात्राकडे पाहिले जाते. मुस्लिम धर्मीयांच्या एकतेचे प्रतीक म्हणूनही याकडे पाहिले जाते.आष्टी शहरातील माजी सेवानिवृत्त जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता इनायततुल्ला बेग,पत्नी आयशा बेग,मुलगा डॉ.सिद्दीक बेग आणि परिवारातील पाच सदस्यांनी काबाचे दर्शन घेत मक्का मशिदी पंधरा दिवस नमाज पठण करत दुवा मागितली.ही यात्रा मुस्लिम बांधवांसाठी पवित्र असल्याकारणाने येथून येणाऱ्या भाविकांचे स्वागत केले जाते याचेच औचित्य साधून आष्टी तालुका पत्रकार संघाच्या वतीने इंजि. इनायततुल्ला बेग यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रफुल भाऊ सहस्रबुद्धे,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,सेवानिवृत्त शॉप निरीक्षक मजहर बेग, नगराध्यक्ष जिया भाई बेग, इंजि.अत्तहर बेग,डॉ.सिद्दीक बेग,पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण पोकळे,उपाध्यक्ष संतोष सानप,पत्रकार गणेश दळवी,पत्रकार सचिन रानडे, शिक्षक राजेंद्र लाड आदी उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मोत्सवानिमीत्त रक्तदान शिबिर, गरजू महिलांना साड्यांचे वाटप

**माजलगाव । प्रतिनिधी**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मोत्सवानिमीत्त सामाजिक बांधिलकी जोपासत ब्रम्हगावचे उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी अभिवादन सभा, रक्तदान शिबीर तसेच गरजु महिलांना साड्यांचे वाटप करत भिम जन्मोत्सव साजरा केला.**

शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक येथे सकाळी १०. वा. रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते तर यानंतर गरजु महिलांना साड्यांचे वाटप देखिल करण्यात आले. सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले ब्रम्हगावचे उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी राबविलेल्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कार्यक्रमास माजी सभापती नितीन नाईकनवरे, डॉ. दिनकर मस्के, डिपीआय जिल्हाध्यक्ष अमोल शेरकर, मानवी हक्क अभियानचे तालुकाध्यक्ष मधुकर कांबळे, पद्माकर कांबळे, सरपंच नारायण भले,



उपसरपंच गणेश शेंडगे, अशोक थोरात, राजू थोरात, विलास लोखंडे, अक्षय थोरात, अंजन कांबळे, हनुमान सरोदे, विक्रांत कांबळे, विशाल थोरात, आकाश कांबळे, दत्ता कांबळे, संतोष कांबळे, प्रदीप कांबळे, प्रशांत कांबळे, युवराज कांबळे, आदित्य वाघमारे, वैभव पवार, अभी कांबळे, शरद कांबळे, प्रविण कांबळे, सुहास क्षिरसागर, श्रीकांत कांबळे, सागर कांबळे, भिष्मा लोखंडे, अजय डोईफोडे, अनिकेत कांबळे, अनिल राधे कांबळे मित्र परिवार उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आष्टी येथे सच्च्या कार्यकर्ताचा सन्मान..!

**आष्टी । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त तालुका आष्टी येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते तसे दरवर्षीप्रमाणे जयंती महोत्सव समितीतर्फे दिवंगत रघुनाथ बंधू निकाळजे सामाजिक स्मृतीस पुरस्काराचे सन्मानपूर्वक वितरण करण्यात आले यावर्षीचा हा पुरस्कार आंबेडकरी चळवळीतील तळमळीचे कार्यकर्ते पंचायत समिती आष्टीचे माजी उपसभापती अरुण भैय्या निकाळजे यांना देण्यात आला अरुण भैय्या यांनी सन १९८२ पासून दलीत आंबेडकरी चळवळीस सुरुवात केली,याच साली पँथर सारख्या आक्रमक संघटनेची स्थापना केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वात स्थापन केली,दलित चळवळीच्या माध्यमातून गायरान चळवळ विद्यापीठ नामांतर चळवळ तालुक्यातील अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम केले चळवळीच्या माध्यमातून अनेक कार्यकर्ते घडवले आंबेडकरी विचार तळागाळापर्यंत पोचण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पँथर संघटना विसर्जित झाल्यानंतर रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आष्टी तालुका उपाध्यक्ष म्हणून या राजकीय संघटनेत काम सुरू केले चळवळी बरोबरच पंचायत समिती आष्टीचे उपसभापती पद आष्टी शहराचे सरपंच पद कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पद कडा साखर कारखान्याचे संचालक पद अशा विविध पदावर काम करण्याची संधी मिळाली विद्यापीठ नामांतर चळवळीचा आंदोलनामध्ये व पँथर चळवळीने दरम्यान त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल झाले अशा प्रामाणिक सच्चा कार्यकर्त्यास आज जयंती महोत्सव समिती आष्टीच्या वतीने आमदार बाळासाहेब आजबे माननीय आमदार भीमराव धोंडे माननीय आमदार साहेबराव दरेकर युवा नेते जयदत्त भैय्या सतीश आबा शिंदे तसेच जयंती महोत्सव कमिटीचे सर्व पदाधिकारी यांच्यातर्फे प्रदान करण्यात आला यावेळी वाल्मिक तात्या निकाळजे,अशोकराव साळवे ॲड रत्नदीप निकाळजे, सरपंच प्रविण गायकवाड,रुपेश निकाळजे,माजी नगरसेवक दिपक निकाळजे,माजी नगरसेवक सादिक कुरेशी राजू निकाळजे नामदेव राऊत आष्टीचे तहसीलदार श्री प्रमोद गायकवाड साहेब,आष्टीचे पोलीस निरीक्षक संतोष खेतमाळ साहेब,पत्रकार सचिन रानडे,पत्रकार गणेश दळवी,पत्रकार अण्णासाहेब साबळे,जयंती कमिटीचे अध्यक्ष अशोक निकाळजे डॉक्टर युवराज तुपेरे कुणाल निकाळजे,सनी काळपुंड सुनील शिंदे सर सचिन निकाळजे सर प्रदीप पगारे, मिलिंद निकाळजे,शशिकांत निकाळजे,योगेश तुपेरे आदींसह हजारो नागरिक व्यापारी सर्व क्षेत्रातील विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते हा पुरस्कार मिळाल्यामुळे माननीय श्री अरुण भैय्या निकाळजे यांचे सर्व क्षेत्रातून हार्दिक अभिनंदन होत आहे आणि अजूनही शुभेच्छाचा वर्षाव होताना दिसत आहे.

# निवडणूक रोखे प्रकरणी मेघा इंजिनिअरिंग कंपनीवर सीबीआयकडून गुन्हा दाखल

## पोलाद मंत्रालयाच्या आठ अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**निवडणूक रोखे (इलेक्टोरल बाँड) खरेदी करण्यात दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीविरोधात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) भ्रष्टाचार प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.**

केंद्रीय अन्वेषण ब्युरो ने अहवालात दिलेल्या माहितीनुसार, कथित भ्रष्टाचाराच्या प्रकरणात हैदराबादस्थित मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि आयर्न अँड स्टील प्लांट आणि पोलाद मंत्रालयाच्या आठ अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'एनआयएसपी'च्या ३१५ कोटी रुपयांच्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत अनियमितता झाल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आल्याचे सीबीआयने शनिवारी (दि. १३) स्पष्ट केले. लाच दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. या कंपनीने ९६६ कोटी रुपयांचे इलेक्टोरल बाँड खरेदी केले होते होते.

### ❯❯ १७४ कोटी रुपयांची बिले काढण्यासाठी ७८ लाख रुपयांची लाच

जगदलपूर इंटिग्रेटेड स्टील प्लांटशी संबंधित कामांच्या संदर्भात मेघा इंजिनिअरिंगची १७४ कोटी रुपयांची बिले काढण्यासाठी ७८ लाख रुपयांची लाच देण्यात आल्याचा आरोप सीबीआयने केला आहे. 'सीबीआय'च्या म्हणण्यानुसार, लाच घेतल्याच्या आरोपाखाली एनआयएसपी आणि एनएमडीसीच्या आठ अधिकाऱ्यांची आणि मेकॉनच्या दोन अधिकाऱ्यांचीही नावे एफआयआरमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.

# कोलकाताची लखनौवर मात

**कोलकाता : कोलकाता नाईट रायडर्सने इंडियन प्रीमिअर लीग २०२४ मध्ये आज लखनौ सुपर जायंट्सवर विजय मिळवला. पाच सामन्यांतील केकेआरचा चौथा विजय ठरला आणि ८ गुणांसह त्यांची दुस-या क्रमांकावरील पकड मजबूत झाली आहे. एलएसजीचा सहा सामन्यांतील तिसरा पराभव ठरला. मिचेल स्टार्कने आज ३ विकेट्स घेतल्या आणि काल मेंटॉर गौतम गंभीरने दाखवलेला विश्वास सार्थ ठरवला.**

केकेआरच्या गोलंदाजांनी चांगला मारा करून एलएसजीच्या धावांवर अंकुश ठेवला होता. मिचेल स्टार्कने २०व्या षटकात दोन विकेट्स घेऊन त्याच्या ४ षटकांत २८ धावांसह तीन विकेट्स पूर्ण केल्या. वैभव अरोरा, सुनील नरीन, वरुण चक्रवर्थी व आंद्रे रसेल यांनी प्रत्येकी १ विकेट्स घेऊन एलएसजीला दडपणात राखले होते. पण, निकोलस पूरनने ते झुगारले आणि ३२ चेंडूंत २ चौकार व ४ षटकारांसह ४५ धावा केल्या. एलएसजीकडून कर्णधार लोकेश राहुल ( ३९) व आयुष बदोनी ( २९) यांनी त्यानंतर सर्वाधिक धावा केल्या. निकोलसच्या फटकेबाजीने लखनौला ७ बाद १६१ धावांचा सन्मानजनक स्कोअर उभा करून दिला. पदार्पणवीर शमार जोसेफच्या पहिल्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर यश ठाकूरने फिल सॉल्टचा झेल टाकला. पण, तो नो बॉलही होता. त्यानंतर जोसेफची लय बिघडली आणि तो एक चेंडू पूर्ण करण्यासाठी जोसेफने १३ धावा दिल्या. त्याच्या पहिल्या षटकात २२ धावा कुटल्या गेल्या. पण, मोहसिन खानने त्याच्या पहिल्या षटकात सुनील नरीनला ( ६) बाद करून केकेआरला पहिला झटका दिला.

# जपान-ओसाका संघटनेची जागतिक अबॅकस चॅम्पियनशिपकरिता मयंक शैलेश चौधरीची निवड

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील जिल्हास्तरीय अबॅकस स्पर्धेमध्ये दोनशे विद्यार्थ्यांचा सहभाग असलेल्या स्पर्धेमध्ये मयंक शैलेश चौधरीने उत्कृष्ट यश मिळवलेले आहे. मयंक चौधरीनी त्याला विचारलेल्या प्रश्नांना काही क्षणांमध्येच उत्तरे देऊन ऐतिहासिक यश मिळवले असून मयंक शैलेश चौधरीने मिळवलेल्या यशामुळे त्याची आंतरराष्ट्रीय जपान ओसाका संघटनेची तेविसाव्या अबॅकस विश्व चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे. जपान जागतिक अबॅकस चॅम्पियनशिप मे २०२४ या कालावधीत ऑनलाइन आंतरराष्ट्रीय ओसाका येथे होणार्या आंतरराष्ट्रीय अबॅकस चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली. मयंक शैलेश चौधरीने मिळवलेल्या यशामध्ये त्याच्या आई-वडिलांचा ही अतिशय मोलाचा सहभाग आहे, सतत प्रयत्नशील सराव करत असल्यामुळे त्याला हे यश मिळालेलं आहे. मयंक शैलेश चौधरीची समाजातील प्रत्येक स्तरांमधून अभिनंदन होत असून मयंक चौधरीच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आलेल्या आहे. अबॅकस आणि वैदिक मॅथमुळे विद्यार्थ्यांचा गणितामधील आवड निर्माण होऊन गणिताबद्दलची मनात असलेली भीती नष्ट होऊन अनेक क्लिष्ट अशा गणितीय पद्धती सोप्या पद्धतीने सोडवल्यासाठी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग केला जातो असे जिल्हा अबॅकस वितरक घोडके एस ए यांनी सांगितले आहे.



## पान १वरून...

### आगामी खरिपासाठी 'महाबीज' चा

कार्यक्रमांतर्गत नवीन वाणांची बियाणे उपलब्धता वाढविण्याचे दृष्टीने नवीन वाणांचा बीजोत्पादन कार्यक्रमात समावेश केला आहे.

----------

### रशियाचे पुतीन आणि नरेंद्र

ही भूमिका घेणे याचा अर्थ रशियाचा पुतीन आणि भारताचा नरेंद्र यात काही फरक नाही अशी खोचक टीकाही यावेळी पवारांनी केली. भाजपाने अबकी बार ४०० पार या घोषणेबाबत प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधीनी सवाल केल्यावर शरद पवार म्हणाले की, मागील निवडणुकीत आम्हाला जास्त जागा मिळाल्या नव्हत्या. चार जागा राष्ट्रवादीला, एक जागा काँग्रेसला आणि एक जागा एमआयएमला मिळाली होती. हे पाच सहा जागांचे चित्र यंदा कितीतरी पटीने वाढलेले असणार आहे. तसे भाजपाने ५४३ चा आकडा सांगणे योग्य होईल असे सांगत भाजपाला उपरोधिक टोलाही लगावला.

-------------

### बाबासाहेबांचे संविधान

चौक येथे नागपूरचे लोकसभा उमेदवार विकास ठाकरे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेसाठी खर्गे आले होते.

--------------

### आष्टी मतदारसंघातुन प्रीतमताई पेक्षा पंकजाताईंना

बोलवण्यात आली होती. या बैठकीला दौलावडगाव गटातील हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. आ. आजबे म्हणाले की, देशात पुन्हा एकदा भाजप प्रणित मोदी सरकार येणार असल्याने जनतेने प्रवाहाच्या विरोधात जाऊ नये. भाजपा सरकार आल्यानंतर पंकजाताई गोपीनाथ मुंडे या शंभर टक्के केंद्रीय मंत्रिमंडळात जाणार आहेत त्यामुळे राज्य सरकार व केंद्र सरकार हे एकाच विचाराचे जर असेल तर मोठ्या प्रमाणात विकास कामे आणता येतात. माजी आमदार व माझे सहकारी भीमराव धोंडे आपण एकत्र मतदारसंघांमध्ये जिल्हा परिषद गट निहाय बैठका घेत आहोत. यापूर्वी आम्ही पिंपळा या ठिकाणी हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये बैठक घेतली आहे. धोंडे साहेब व माझ्यात काहीही वाद नाही. ज्येष्ठ म्हणून आपण नेहमी त्यांचा सन्मान व त्यांचा सल्ला घेतो, असे ते म्हणाले. यावेळी बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांच्यामुळे देशाचे नाव जगात झाले आहे. त्यांनी संरक्षण क्षेत्रामध्ये भरपूर काम केले असून, आज देशांमध्ये विविध प्रकारच्या हत्यारे, दारुगोळा बनवण्याच्या कंपन्या स्थापन झाल्या आहेत. आपण अनेक बाबींमध्ये स्वावलंबी झालो असून, शेती क्षेत्रामध्येही मोठ्या प्रमाणात उत्पन्न वाढ झाली आहे. गरिबी हटवण्यासाठी मोठे यश मोदींना आले आहे. महायुतीकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी हे एकमेव उमेदवार असल्याने त्यांना यापुढेही पाच वर्षे संधी मिळणार आहे. पंकजाताईंना केंद्रात पाठवल्यानंतर अनेक मोठी कामे मार्गी लागणार आहेत त्यासाठी आपण पंकजाताईंना प्रीतमताई मुंडे यांच्या पेक्षा भरघोस मतांनी निवडून द्यायचे आहे. कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहन भीमराव धोंडे यांनी शेवटी केले. यावेळी वाल्मीक तात्या निकाळजे, शंकर देशमुख, भाऊसाहेब लटपटे, अशोक साळवे,परसराम मराठे, भरत जाधव, संजय विधाते, नवनाथ तांदळे, महादेव डोके यांनी मार्गदर्शन केले. बैठकीस दौलावडगाव गटातील महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट, भारतीय जनता पार्टी व शिंदे शिवसेना गटाचे सर्व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष मेहबूब भाई शेख हे होते तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा, कैलास वायभासे यांनी केले. आभार दिलीप तांदळे यांनी मानले. हरीभाऊ दहातोंडे, शामराव फसले, सतीश कोहक ,नंदू फसले, कैलास वायबसे, परसराम मराठे, महादेव डोके यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

-------------

### सरबजीत सिंग यांच्या

भारत-पाकिस्तान सीमेवर आहे. त्यांचे कुटुंबीय आणि मित्रांच्या म्हणण्यानुसार, सरबजीत इतरांच्या शेतात मजुरी करायचे. त्यांना कसूर जवळ पाकिस्तान रेंजर्सनी अटक केली होती. ते बेपत्ता झाल्याची तक्रार त्यांच्या कुटुंबीयांनी केली. सरबजीत यांची बहीण आणि कुटुंबीयांना त्यांचा ठावठिकाणा लागला नव्हता, एक वर्षानंतर त्यांना सरबजीत यांचे एक पत्र आले. यानंतर त्यांना पाकिस्तानने अटक केल्याचे उघड झाले होते. ओळखीचा पुरावा नसल्यामुळे त्यांना मनजीत सिंग म्हणून दोषी ठरवून पाकिस्तानने त्यांना फाशीची शिक्षा ठोठावली असल्याचेही या पत्रात नमूद करण्यात आले होते. त्याच्यावर लाहोर बॉम्बस्फोटातील आरोप असाही ठपका ठेवण्यात आला होता. सिंग यांच्या वकिलांनी अनेक दयेच्या याचिका दाखल केल्या होत्या. पाचव्या याचिकेत भारतातून गोळा केलेल्या १००,००० स्वाक्षऱ्यांचा समावेश होता. कोणतीही दयेची याचिका स्वीकारली गेली नाही. २०१२ मध्ये पाकिस्तानचे तत्कालीन राष्ट्रापती आसिफ अली झरदारी यांनी त्यांच्या फाशीची शिक्षा जन्मठेपेत रुपांतर करण्यासाठीच्या दस्तऐवजावर स्वाक्षरी केली होती. सरबजीत यांना लाहोरच्या कोट लखपत तुरुंगात २३ वर्षे ठेवण्यात आले होते. अखेर २६ एप्रिल २०१३ रोजी सरबजीत यांची विटा, धारदार धातूचे पत्रे, लोखंडी रॉड आणि ब्लेडने वार करण्यात आले. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. उपचार सुरु असताना २ मे २०१३ रोजी सरबजीत सिंग यांचा मृत्यू झाला होता.

---------------

### यानंतर घराबाहेर

त्यामुळे त्याची सुरक्षाही वाढवण्यात आली होती. रविवारी पहाटे ४.५० वाजता दोन अज्ञात दुचाकीस्वारांनी वांद्रे येथील सलमान खानच्या गॅलेक्सी अपार्टमेंटबाहेर हवेत तीन ते चार राऊंड गोळीबार केला. त्यानंतर तेथून त्यांनी पळ काढला. दोघांनी हेल्मेट घातले होते, त्यामुळे त्यांची ओळख पटू शकली नाही. त्या गोळ्यांच्या खुणा अपार्टमेंटबाहेरही सापडल्या आहेत. एक गोळी त्याच्या बाल्कनीच्या जाळीलाही लागली आहे. या घटनेनंतर सलमानची सुरक्षा आणखी कडक करण्यात आली आहे. मुंबई पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला असून गोळीबार करणाऱ्यांचा शोध सुरू केला आहे. लॉरेन्स बिश्नोई तुरुंगात असला तरी त्याची टोळी बाहेर असून गोल्डी ब्रारही बाहेर असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत याच टोळीने अभिनेत्याच्या घराबाहेर गोळीबार केल्याचा पोलिसांचा अंदाज आहे. या घटनेनंतर सलमानच्या सुरक्षेत वाढ करण्याच्या सुचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

-------------

### नंदुरबारची मिरची, आमचूर

परराज्यांत मोठी मागणी आहे. या दोन्ही वस्तूंना जागतिक दर्जाच्या वस्तू म्हणून मान्यता मिळाव्या यासाठी जी.आय. मानांकन मिळावे यासाठी प्रयत्न सुरू होता. त्याकरिता नाबार्ड, डॉ. हेडगेवार सेवा समिती आणि कृषी विज्ञान केंद्र यांनी पाठपुरावा केला होता. त्याला यश आले असून नुकतेच या दोन्ही वस्तूंना जी.आय. मानांकन मिळाले आहे. भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाअंतर्गत डिपार्टमेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडस्ट्री अँड इंटर्नल ट्रेडने याबाबत अधिकृत माहिती प्रसिद्ध केल्याचे नाबार्ड, हेडगेवार संस्था व कृषी विज्ञान केंद्रातर्फे सांगण्यात आले.

---------------

### महामानवास अभिवादन !

**दिशा देण्याचे भरीव काम!**

भारतातील वर्ग लढ्याला आणि जाती अंताच्या लढ्याला आकार आणि दिशा देण्याचे भरीव काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. जागतिक पातळीवर शोषण मुक्ती आणि समतेसाठीच्या लढ्यांमध्येही बाबासाहेब आंबेडकर प्रेरणादायी ठरले आहेत. वर्ग, जात, धर्म, लिंग यांचा भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान अधिकार यासाठी आंबेडकरांनी काम केले. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतून भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली.असा हुंकार अभिवादनावेळी आंबेडकरी जनतेने व्यक्त केला.

**मिरवणूक निघाली हर्षोउल्हासात**

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून मिरवणूकीस सुरुवात झाली. सदरील मिरवणूक बलभीम चौक, माळीवेस मार्गे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा इथपर्यंत काढण्यात आली. या मिरवणूकीत डोळ्यांचे पारणे फेडणारे देखावे जयंती उत्सव समित्यांकडून तयार करण्यात आले होते. मिरवणूकीत विविध कसरती तसेच विद्युत रोषणाईने शहर उजाळून निघाले होते.

**जिल्हा प्रशंसानाकडून राबविण्यात आले स्वाक्षरी मोहीम अभियान**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनाकडून छत्रपती शिवाजी महाराज चौकात सेल्फी पॉईंट आणि मतदार जनजागृती स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले.या अभियानाला मोठा प्रतिसाद मिळाला. होवू घातलेली लोकसभा निवडणुक लक्षात घेता, मतदारांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी सदरील अभियान राबविण्यात आले होते.

--------------

cmyk

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार, दि. १५ एप्रिल २०२४



## पंचनाम्याचे नाटक नको, हेक्टरी लाख रुपये मदत द्या –भाई मोहन गुंड

माजलगाव : बीड जिल्ह्यात गारपिटीने झालेल्या शेतकऱ्याच्या फळबागेसह आंबा, कांदा, चिंच, लिंब आधी पिकांच्या नुकसानीची शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड, भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्यासह कार्यकर्त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली त्यावेळी शेतकऱ्याच्या शेतातील विविध पिके उध्वस्त झालेले असून शेतकरी पूर्णतः कोलमडला असून त्याचे कुटुंब प्रचंड संकटात असताना व शेतकऱ्यांचे लाखो रुपयाचे नुकसान झालेले



असताना त्याच्या कुटुंबाला आधार देण्याऐवजी कृषीमंत्री पंचनाम्याचे नाटक करत शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसण्याचे पाप करत असल्याचा आरोप शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी केला, यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी भावनिक होऊन आपल्या व्यथा मांडल्या त्यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी शेतकरी कामगार पक्ष शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत कृषीमंत्र्यांनी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना भरीव मदत करणे त्यांचे कर्तव्य असताना, शेतकऱ्यांना भरीव मदत न देता केवळ पंचनाम्याचे नाटक करून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे पाप कृषी मंत्री करत असल्याचा आरोप केला यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील, दीपकराव सोळंके, एकनाथ खेत्री, भाई मुंजा पांचाळ, भाई श्रीराम शेवाळे, भाई विष्णू शेळके आदी कार्यकर्त्यांसह शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते.

## आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर दलितांसोबतच बहुजनांचा उद्धार केला - राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आधुनिक भारताचे शिल्पकार बोधिसत्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर दलितांसोबतच बहुजनांचा देखील उद्धार केला मत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करतांना बोलत होते. शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. यावेळी माजी नगरसेवक सुनील वाघाळकर, धम्मा सरवदे, अंकुश हेडे, खलील जाफरी, विशाल पोटभरे, आकाश कऱ्हाड, शरद काळे, संतोष चिमणे हे उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना राजकिशोर मोदी म्हणाले की

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फक्त एका व्यक्तीचे नाव नाही तर हा एक विचार आहे. ज्यांनी ज्यांनी – हा विचार आपल्या डोक्यात घेतला, त्यांना त्यांना या जगाने डोक्यावर घेतले. हा इतिहास नाही तर वर्तमान वास्तव आहे. हातात तलवार घेऊन किंवा अन्य भावनिक पध्दतीने समाजाला आपला बाजूने वळवता येत नाही. त्यासाठी त्या काळातील सर्वोच्च ज्ञान आपल्या मस्तकात असणे गरजेचे असते हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकोणिसाव्या शतकातच हेरले होते.त्याचमुळे आजही जगात 'सिम्बॉल ऑफ नॉलेज' हे वाक्य उच्चारताच आपल्यासमोर उभा राहतं ते जग बदलणाऱ्या बाप माणसाचं व्यक्तिमत्त्व ते म्हणजेच 'भीमराव रामजी आंबेडकर' अर्थात विश्वरत्न 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' असे स्पष्ट भावना राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी व्यक्त केली.



त्याकाळच्या समाज व्यवस्थेने सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक बाबतीत बहुजन व दलितांना आयुष्यभर गुलाम बनवले ज्याना पाण्यापासून ते शिक्षणापर्यंत वंचित ठेवले अशा सर्वांसाठी १४ एप्रिल हा दिवस उत्सव आहे. आणि हा उत्सव सर्वजण जग बदलणाऱ्या बापमाणसाच्या विचारांच्या माध्यमातून साजरा करत आहेत ही आनंदाची बाब असल्याचे देखील राजकिशोर मोदी यांनी बोलून दाखवले.संकटांना सामोरे जात खंबीरपणे उभा राहता आलं पाहिजे हा विश्वास देखील बाबासाहेबांनी अनेक पिढ्यांना दिलेला आहे. आपण चाळीत राहतो म्हणून अमेरिका हा आपला प्रांत नाही असं बाबासाहेबांना कधीच वाटलं नाही.त्यांनी तर त्या चाळीत राहूनच अमेरिका, इंग्लंड येथील विद्यापीठांना गवसणी घातली. आपणही हे करू शकतो हा विश्वास हा माणूस देऊन जातो.खिशात पैसे नाहीत म्हणून केवळ पाव खाऊन अभ्यास करणारे अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील रुपयाची समस्या लंडन विद्यापीठात मांडली. आत्मविश्वासाच्या बळावरच हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शक्य झाले असल्याचे देखील राजकिशोर मोदी यांनी यावेळी बोलताना नमूद केले. अशा या महामानवाला राजकिशोर मोदी व सहकार्यांच्या वतीने त्यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त कोटी कोटी वंदन !

## सजग आशा सेविकेमुळे माता व बाळ सुखरूप

### स्वाराती रुग्णालयाच्या प्रसूति विभागाची तत्पर्तता आली कामी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत माता-बाल मृत्यू नियंत्रणात आणण्यासाठी आशा सेविका देशातील गावागावांत सेवा देत आहेत. शासनाच्या आरोग्यासंबंधी योजनांना घरोघर पोहचविण्याचे कार्य त्या पूर्ण जबाबदारीने पार पाडत आहेत. विशेष म्हणजे, माता-बाल मृत्यू नियंत्रणात आणण्यासाठी आशा सेविकांची उत्कृष्ट कामगिरी असल्याचे आपण अनेक वेळा अनुभवले आहे. याचाच प्रत्यय काल रात्रीअंबाजोगाई तालुक्यातील येल्डा येथील गरोदर मातेच्या बाबत आला.



तालुक्यातील येल्डा गावातील गरोदर माता जिल्हा अचानक रात्री हृदयविकाराचा झटका आला.ती माता आठ महिन्याची गरोदर होती. रात्री लाईट नाही, आभाळ दाटून आलेले होते. अशा परिस्थितीमध्ये गरोदर मातेला हृदयविकाराचा झटका आला.ही माहिती या गावच्या आशा सेविका शीला गायकवाड यांना समजली.त्यांनी क्षणाचाही वेळ न घालवता लगेच नातेवाईकांना सोबत घेऊन सदरील मातेला स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयाच्या प्रस्तुती विभागात दाखल केली. येथे दाखल केल्यानंतर तेथील डॉक्टरांनी सुद्धा क्षणाचाही विलंब न करता तात्काळ शस्त्रक्रिया करून प्रसूति केली. आणि बाळ व मातेला सुखरूप या प्रसंगातून बाहेर काढले.त्याबद्दल आशा सेविका यांनी बोलताना सांगितले की तालुका आरोग्य अधिकारी डॉ.बाबासाहेब लोमटे व तालुका समन्वयक काझी मॅडम यांनी घेतलेल्या वेळोवेळी प्रशिक्षणाचा या ठिकाणी उपयोग झाला. भविष्यामध्ये असा प्रसंग कोणावर येऊ नये,मात्र जरी कोणावर वेळ आली तर वेळेवर उपचार मिळाला की अनुचित घटना टाळू शकतो. अशा सेविका यांनी दाखवलेल्या तत्परतेबद्दल व डॉक्टरांनी सुद्धा क्षणाचाही विलंब न लावता केलेल्या उपचाराबद्दल सर्व स्थानातून कौतुक होत आहे.

## तांदळा परिसरात अवकाळी पावसाचा तडाखा; रब्बी पीकांचे नुकसान

**तांदळा । प्रतिनिधी**

जिल्ह्यात सलग चार दिवसापासून अवकाळी पाऊस व गारपीट झाली. जिल्ह्यातील अनेक भागांत गारपिटीचा तडाखा बसल्याने रब्बी हंगामातील पिकांचे नुकसान झाले आहे. आज दि.१३ एप्रिल रोजी गेवराई तालुक्यातील मादळमोही, तांदळा, काजळा, सैदापूर, जोडवाडी, कोळगाव, बंगाली पिपळा यापरिसरात दुपारी ३ वाजण्याच्या दरम्यान अवकाळी पाऊस झाला.

अवकाळी पावसामुळे आणि गारपिटीमुळे आंबा, टरबूज, खरबूज, कांदा आणि



भाजीपाला आदी पीक नेस्तनाबूत झाले असून, उन्हाळी बाजरीही भुईसपाट झाल्याचे अनेक ठिकाणी पाहायला मिळाले. गेवराई तालुक्यातील फळबागांना फटका बसला. तालुक्यात वीज कोसळून एक महिला ठार झाली तर एक मुलगा जखमी झाला, तर तांदळा येथील शेतकरी आबासाहेब पाटील यांच्या शेतातील एक एकर कांदा पीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तापमानाचा पारा चाळीशीच्या पुढे गेला असताना मागील चार दिवसात झालेल्या अवकाळी पावसामुळे काहीसा उष्णतेपासून दिलासा मिळाला. परंतु, पावसामुळे उन्हाळी ज्वारी, बाजरी तसेच भाजी पिकांचे नुकसान झाले. असे चित्र पाहवयास मिळत आहे.



## कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये १४ एप्रिल रविवार रोजी सकाळी ११:०० वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जयंती उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे संचालक अमोल जाधव मा. प.स.सदस्य मुरलीधर साळवे व सर्व अधिकारी कर्मचारी बांधव उपस्थित होते.

## केज बसस्थानकात अक्षर सेवाभावी संस्था व शिक्षक मित्रपरिवाराकडून पाणपोई चे लोकार्पण

**केज । प्रतिनिधी**

केज बसस्थानकात अक्षर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व शिक्षक मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीसूर्य महात्मा फुले जयंती व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी मोफत पाणपोईचे लोकार्पण करण्यात आले.



डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजनांसाठी सत्याग्रह केला.तोच वारसा घेऊन आज भर उन्हाळ्यातली गरज ओळखून पाणपोई ची सुरुवात करण्यात आली. एप्रिल ते जून या कालावधीत नागरिकांना शुद्ध पाणी मोफत मिळणार आहे.दैनंदिन व्यवस्थापन श्री गवळी करणार आहेत.

लोकार्पण कार्यक्रमास तहसीलदार अभिजित जगताप, पोलीस ठाण्याचे पोनि प्रशांत महाजन,आगार प्रमुख चौरे ,गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर, डॉ हनुमंत सौदागर,शिक्षणविस्तार अधिकारी सुनील केंद्रे,दत्ता चाटे,जयपाल मस्के,जयदीप देशमुख, नितीन देशमुख,अश्रूबा सोनवणे,भारत हांगे, अक्षर सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष विष्णू यादव, जी बी गदळे,किशोर भालेराव,विक्रम डोईफोडे, ,युवराज हिरवे ,महादेव ढाकणे,आदींची उपस्थिती होती. पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी बोलताना डॉ बाबासाहेबांचा जयंतीनिमित्त स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वीत्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विक्रम डोईफोडे केले आभार संजय चौरे यांनी मानले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य समता ज्योत रॅली उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती च्या पूर्वसंध्येला शिव-फुले-शाहू-आंबेडकरी अनुयायी व पोलीस प्रशासन माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य समता रॅली चे आयोजन करण्यात आले होते ही समता रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोहचली व तेथे ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन जुना मोंढा रोड या मार्गाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक भीम नगर माजलगाव येथे ठीक १२ वाजता बुद्ध वंदनेने रॅलीची सांगता झाली व डॉ.बाबासाहेब आंबेडकर



यांच्या अर्धकृती स्मारकास पुष्पहार अर्पण करून उपजिल्हाधिकारी गौरव इंगोले व आय.पि.एस डॉ.धिरजकुमार बच्चु यांनी व तमाम जनसमुदायांनी अभिवादन केले.

या समता ज्योत रॅली मध्ये उपजिल्हाधिकारी गौरव इंगोले, उपविभागीय पोलीस अधीक्षक डॉ.धीरज कुमार ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालक कोळी व सर्व पोलीस प्रशासन तसेच माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, दयानंद स्वामी, नितीन नाईकनवरे, नवनाथ धाईजे, सुरेंद्र रेदासणी, विजय साळवे, कचरुतात्या खळगे, ज्ञानेश्वर मेंडके, तुकाराम येवले, डॉ.अशोक तिडके अविनाश बनसोडे, अविनाश जावळे, राजेश घोडे, धम्मानंद साळवे, अभिजीत पोटभरे, अभिनेते विश्वजीत पोटभरे, अशोक मगर, चंद्रमुनी डोंगरे, दिपक टाकणखार, ॲड.अमोल डोंगरे, दत्ता कांबळे, मुज्जमील पटेल, रियाज काझी, फारुख आण्णा, सत्यभामा सौंदरमल, प्रा.सुदर्शन स्वामी, सदानंद प्रधान, अजय शिंदे, नरहरी जावळे व माजलगाव येथील सर्व धर्मिय शिव-शाहू-फुले-आंबेडकरी युवकांची उपस्थिती होती. हि रॅली यशस्वी करण्यासाठी माजलगाव शहर पोलीस अधीक्षक केतन राठोड व शिव-फुले-शाहू-आंबेडकरी अनुयायी ऋषिकेश सोनवणे, विशाल सोनपसारे, राज सोनवणे, अजिंक्य वाघमारे, गब्बर ससाणे, सुबोध खळगे, संदेश लांडगे, रविराज भालेराव, सुजल खळगे, आदींनी परिश्रम घेतले.

## सफाई नसल्याने सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स परिसरात डासांचे थैमान

बीड /प्रतिनिधी

बीड शहरातील अत्यंत मोक्याचे ठिकाण असलेल्या सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स मध्ये गेल्या अनेक दिवसापासून नाल्याच न काढल्याने या नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा कचरा साचून पाणी तुंबलेले असून यामुळे या परिसरात डासांनी थैमान घातले आहे. कॉम्प्लेक्स मध्ये नाल्याची सफाई करावी आणि डास मारणारे औषध फवारावे अशी मागणी परिसरातील व्यावसायिकांनी केली आहे. सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स परिसर कायम गजबजलेला असतो. या ठिकाणी सायंकाळी नागरिकांची मोठी गर्दी असते. या परिसरात असलेल्या नाल्या गेल्या अनेक दिवसांपासून साफ केलेल्या नाहीत त्यामुळे नाल्यांमध्ये प्लॅस्टिकचा कचरा साचून डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात



वाढले आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधीही सुटली आहे. रस्त्याने चालतांना नाक दाबून चालायची वेळ आली आहे

परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असल्याने डासांपासून मलेरिया, डेंगू अशा प्रकारच्या साथ रोगांची लागण नागरिकांना होऊ शकते. याची खबरदारी घेऊन नगरपालिका प्रशासनाने या नाल्या नियमीत साफ करून या ठिकाणी डास निर्मूलन करणारे औषध फवारावे असी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत. महीनो महिने या भागातील नाल्या साफ केल्या जात नाहीत. त्यामुळे या ठिकाणी दुर्गंधी सुटलेली आहे.याची नगर पालीकेने गंभीर दखल घ्यावी अशी मागणी होत आहे.

## मतदानाची जबाबदारी चोख पार पाडा ;सहाय्यक निवडणूक अधिकारी प्रमोद कुदळेंचे आष्टी मतदार संघातील कर्मचाऱ्यांना आवाहन

**आष्टी । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदारसंघांतर्गत निवडणूक कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणाच्या माध्यमातून कामाचे स्वरूप जाणून घ्यावे आणि आपली जबाबदारी चोखपणे पार पाडावी,अशी सूचना सहायक निवडणूक निर्णय अधिकारी प्रदिप कुदळे यांनी केली.

आष्टी विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रावर नियुक्त २ हजार क्षेत्रीय अधिकारी, समन्वय अधिकारी, मतदान केंद्रावर प्रत्यक्ष काम करणारे केंद्रप्रमुख व सहाय्यक अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी मतदान प्रक्रिया,ईव्हीएम व व्हीव्हीपॅट हाताळणीबाबत आष्टी येथील मोरेश्वर लॉन्स येथे दि.१२ व १३ रोजी दोन दिवसीय प्रशिक्षणास सुरुवात झाली त्यावेळी कुदळे बोलत होते.प्रशिक्षणाला तहसीलदार प्रमोद गायकवाड, नायब तहसीलदार चौरे,नायब तहसिलदार बाळदत्त मोरे समन्वय अधिकारी आदी उपस्थित होते.दोन दिवसीय प्रशिक्षण सत्राच्या पहिल्या दिवशी मार्गदर्शन करताना कुदळे यांनी अधिकारी व कर्मचारी यांची मतदानाच्या आदल्या दिवशी व प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीचे कर्तव्य व अधिकार याबाबत सविस्तर माहिती दिली.निवडणूक कामकाज करताना होणाऱ्या चुका टाळण्याबाबत मार्गदर्शन करतांना निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे सर्वांनी पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मतदान प्रक्रिया निष्पक्ष व खुल्या वातावरणात पार पाडण्यासाठी मतदान करणाऱ्या मतदाराला केंद्रस्थानी मानून आपले राष्ट्रीय कर्तव्य प्रत्येकाने पार पाडावे असे आवाहन त्यांनी केले.

कर्तव्य करतांना प्रत्येक अधिकाऱ्याने गोपनीयतेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.कोणीही प्रशिक्षण व प्रत्यक्ष मतदान यंत्र हाताळणीचे प्रात्यक्षिक टाळू नये, असे आवाहनही मोरे यांनी केले.समन्वय अधिकारी यांनी मतदान यंत्राबाबत माहिती दिली.प्रशिक्षण सत्रांमध्ये प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मतदान यंत्रे स्वतः हाताळावीत.प्रशिक्षणार्थींनी प्रात्यक्षिकाच्या आधारे मतदान प्रक्रियेची माहिती करून घ्यावी, यामुळे प्रत्यक्ष मतदानावेळी चुका होणार नाहीत, असे त्यांनी सांगितले. सादरीकरणाच्या माध्यमातून यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

## डॉ.शेख आवेज एमबीबीएस उत्तीर्ण मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सत्कार

**पाटोदा । प्रतिनिधी**

येथील रहिवासी शेख अहेमद महमद ( शिक्षक प्रगती विद्यालय बालेपीर बीड) यांचे चिरंजीव डॉ.शेख आवेज अहेमद नुकत्याच मिडिकल महाविद्यालयचे लागलेल्या निकालात हे एमबीबीएस मध्ये उर्त्तीण झाल्याबद्दल मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.शेख आवेज यांनी



नेटच्या परिक्षेत राज्यात १४ वा क्रमांक येवुन एमबीबीएस बी टी वैद्यकीय महाविद्यालय तालुका इगतपुरी जिल्हा नाशिक येथून उत्तीर्ण झाले तसेच डा.शेख आवेज यांचे प्राथमिक शिक्षण प्रगती विद्यालय बालेपीर बीड येथे झाले. मराठी पत्रकार परिषदेच्या सत्कार

वेळी जेष्ठ पत्रकार तथा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अ.कादर मकराणी (चाऊस) दै.झुंजारनेता प्रतिनिधी विजय जाधव, मराठी पत्रकार परिषदेचे तालुका सचिव तथा दै.लोकमत ता.प्रतिनिधी अजय जोशी,दै.प्रजापत्र प्रतिनिधी सय्यद रियाज, साप्ताहिक शिवसंकेत संपादक प्रा.सचिन गायकवाड, मराठी पत्रकार परिषद संल्गन डिजिटल मिडिया तालुकाध्यक्ष तथा दै.दिव्यवार्ता प्रतिनिधी जावेद शेख, मासिक सावता दिप चे संपादक डिंगबर नाईकनवरे , शहराध्यक्ष मराठी पत्रकार परिषद हमीदखान पठाण उपस्थित होते.

cmyk

# अवकाळीचा जोर किती दिवस राहणार?

## पंजाबराव डखांचा अंदाज काय?शेतकऱ्यांनी काय काळजी घ्यावी

राज्यातील हवामानात मोठा बदल होत असल्याचं चित्र पाहयला मिळत आहे. कुठं उन्हाचा चटका जाणवत आहे, तर काही भागात अवकाळी पावसानं थैमान घातलं आहे. मराठवाड्यासह विदर्भातील काही जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळं शेती पिकांना चांगलाच फटका बसलाय. दरम्यान, अवकाळी पावसाचे वातावरण आणखी किती दिवस राहणार? राज्यातील हवामानाची स्थिती काय असणार याबाबतची माहिती हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिलीय. राज्यात १८ एप्रिल पर्यंत म्हणजे पुढील पाच दिवस पावसाची शक्यता कायम राहणार असल्याची माहिती डख यांनी दिलीय.



राज्यातील विदर्भ आणि मराठवाडा विभागात पावसाची शक्यता कायम : हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात अवकाळी पावसाची शक्यता कायम आहे. पंजाबराव डख यांनी सांगितल्याप्रमाणे राज्यात १८ एप्रिल पर्यंत पावसाची शक्यता कायम राहणार आहे. राज्यातील विदर्भ आणि मराठवाडा विभागात या कालावधीत पाऊस पडण्याची शक्यता डखांनी व्यक्त केली आहे. परभणी जिल्ह्यात देखील १८ एप्रिलपर्यंत वातावरण बिघडलेले राहणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

शेतकऱ्यांनी काय काळजी घ्यावी? : दरम्यान, १८ एप्रिलपर्यंतच्या या कालावधीत राज्यातील विविध भागांमध्ये जोरदार वादळी वारे वाहतील अशी माहिती पंजाबराव डख यांनी दिली आहे. या काळात वादळी वाऱ्यासह पाऊसही होणार आहे. या कालावधीत बरसणारा पाऊस हा सर्वदूर होणार नाही, मात्र काही-काही भागात पाऊस हजेरी लावणार असल्याची माहिती पंजाबराव डख यांनी दिली आहे. त्यामुळं शेतकऱ्यांनी आपल्या शेती पिकांची विशेष काळजी घेतली पाहिजे असे आवाहन त्यांनी केले आहे. कांदा, हळद तसेच इत्यादी हार्वेस्टिंग झालेला शेतमाल झाकून ठेवावा अशी माहिती पंजाबराव डख यांनी दिली आहे.

मराठवाडा आणि विदर्भात अवकाळी पावसामुळं शेती पिकांना फटका : सध्या मराठवाडा आणि विदर्भात अवकाळी पावसानं थैमान घातलं आहे. शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. आंबा, लिंबू, केळीच्या बागा, ज्वारी तसेच भाजीपाला पिकांना मोठा फटका बसला आहे. तर काही ठिकाणी गारपीट देखील झालीय. त्यामुळं राज्यातील शेतकरी चिंतेत आहेत. सध्या उन्हाळ्याच्या काळात अवकाळी पाववसाचा जोर असल्याचं चित्र पाहायला मिळत आहेत. अशातच आणखी पाच दिवस राज्यात अवकाळी पावसाचा इशारा पपंजाबराव डखांनी दिला आहे.

## कणेरी कृषी विज्ञान केंद्रात माती सुपोषण व संवर्धन अभियान



कोल्हापूर : श्री सिद्धगिरी कृषी विज्ञान केंद्र कनेरी व श्री सिद्धगिरी मठ महासंस्थान यांनी आयोजित केलेल्या माती सुपोषण व संवर्धन कार्यक्रमास कोल्हापूर जिल्ह्यामध्ये चांगला प्रतिसाद मिळाला. परमपूज्य अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजी चेअरमन श्री सिद्धगिरी कृषी विज्ञान केंद्र कनेरी यांनी आव्हान केल्यानुसार कोल्हापूर जिल्हातील बऱ्याच गावातील शेतकऱ्यांनी या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला. जिल्ह्यातील विविध गावातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील ओंजळभर माती आणून गावातील सार्वजनिक ठिकाणी किंवा मंदिराच्या ठिकाणी गोळा केली. त्या मातीची एका पांढऱ्याशुभ्र कापडावरती किंवा काही ठिकाणी शेणाचा सडा दिलेल्या जागेवरती रास करण्यात आली. त्यावरती एक कलश ठेवण्यात आला. मातीची रास व कलश पानांनी, फुलांनी व रांगोळीने सजवण्यात आले.

शेतकरी कुटुंबांनी या मातीचे व कलशाचे पूजन केले व इतर उपस्थित शेतकऱ्यांसमोर मातीचा संरक्षण व संवर्धन करण्यासाठी मंत्र अर्थासहित शेतकऱ्यांना सांगण्यात आले. उपस्थित शेतकऱ्यांनी माती व कलश्यावर फुले व अक्षदा वाहून जलाभिषेक केला. यासोबत ज्या गावांमध्ये अशा प्रकारचे कार्यक्रम करण्यात आले. त्या सर्व गावांनी पाडव्याच्या शुभ दिवशी मातीचे सुपोषण व संवर्धन करण्यासाठी संकल्प व प्रतिज्ञा घेतली. शेतकऱ्यांनी मातीची धूप रोखण्यासाठी उपाययोजना करू, नैसर्गिक शेती करण्यासठी प्रयत्न करू, रासायनिक खताचा व कीटकनाशकांचा वापर कमीत कमी करणार, जास्तीत जास्त झाडांची लागवड करणे, प्लास्टिक, थर्मोकोल इत्यादी मातीचे प्रदूषणकरणाऱ्या पर्यायांचा कमीत कमी वापर करणे, देशी गोपालनास चालना देणे, कागद व झाडापासून बनणाऱ्या इतर वस्तू जेव्हा अत्यावश्यक असतील तेव्हाच वापर करून व या वस्तूंच्या पुनर्वापर करण्याबाबत सावधगिरी बाळगने, या सर्व पर्यायांच्या अंमलबजावणीसाठी मी अत्यंत प्रामाणिकपणे प्रयत्न करेन, ज्यात माझ्या राष्ट्र आणि पृथ्वी मातेचे हित समाविष्ट आहे इत्यादी सारख्या व जमिनीच्या आरोग्य चांगलं राखण्यासाठी जे जे पर्याय अवलंब करावे लागतील ते सर्व पर्याय अवलंब करण्याची प्रतिज्ञा सर्व उपस्थिती शेतकऱ्यांना देण्यात आली.

सर्व कार्यक्रम संपन्न झाल्यावरती राशीत जमा केलेली माती सर्व उपस्थित शेतकर्यांना थोडी थोडी घेऊन आपल्या शेतामध्ये टाकण्यासाठी देण्यात आले. अशा प्रकारे कोल्हापूर जिल्हात पाडव्याच्या शुभ दिवशी २५० अधिक गावामध्ये माती सुपोषण व संवर्धन अभियानातर्गत कार्यक्रम घेण्यांत आले.

## किसानचा १७ वा हप्ता हवा असेल तर आधी 'हे' काम करा, अन्यथा हप्त्यापासून राहाल वंचित

केंद्र सरकार विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देत असते. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी या हेतूने सरकार शेतकऱ्यांना मदत करत असते. अशीच एक योजना म्हणजे पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना. या योजनेच्या माध्यमातून सरकार शेतकऱ्यांना प्रतिवर्षी ६००० रुपयांची आर्थिक मदत देते. ही मदत शेतकऱ्यांनी हप्त्यात दिली जाते. आत्तापर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात १६ हप्ते जमा झाले आहेत. १७ वा हप्ता कधी मिळणार याची अपेक्षा आहे. दरम्यान, तुम्हाला जर १७ वा हप्ता हवा असेल तर काही महत्वाची काम आत्ताच तुम्हाला करावी लागतील अन्यथा १७ वा हप्ता तुम्हाला मिळणार नाही. शेतकऱ्यांनी नेमकी काय काळजी घ्यावी? : सरकारनं आत्तापर्यंत पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचे १६ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केले आहेत. लवकरच १७ वा हप्ता देखील शेतकऱ्यांना मिळणार आहे. दरम्यान,शेतकऱ्यांना १७ वा हप्ता मिळण्यापूर्वी जमिनीची पडताळणी करणं आवश्यक आहे. त्यासंदर्भातील कागदपत्रे अपडेट करणं गरजेचं आहे, अन्यथा तुम्हाला १७ वा हप्ता मिळणार नाही. तसेच अनेक शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी देखील केली नाही. शेतकऱ्यांनी लवकरात लवकर ई-केवायसी करणं गरेजचं आहे. अन्यथा त्यांचा १७ वा हप्ता मिळणार नाही. तसेच तुम्ही पंतप्रधान किसान सन्मान निधीसाठी अर्ज भरताना काही चूक केली असेल, म्हणजे नाव, किंवा चुकीचे लिंग, आधार कार्ड क्रमांक अशा काही चुका केल्या असतील तर तुमच्या खात्यावर पंतप्रधान किसान सन्मान निधीचा १७ वा हप्ता जमा होणार नाही. याची काळजी सर्व शेतकऱ्यांनी घ्यावी.

२०१९ मध्ये मोदी सरकारनं ही योजना सुरु केली : सरकारनं शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी यासाठी पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना सुरु केली. २०१९ मध्ये मोदी सरकारनं ही योजना सुरु केली होती. या योजनेअंतर्गत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा केली जाते. प्रत्येकी चार महिन्याला लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात २००० रुपये जमा केले जातात. दरम्यान, याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारनं देखील शेतकऱ्यांना वार्षिक ६००० रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

## पॉलिहाऊसमध्ये गुलाबाची लागवड करा आणि कमवा लाखो रुपये

ज्यावर राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाकडून ५० टक्के अनुदान दिले जाते. या फुलाची लागवड फक्त पॉलीहाऊसमध्येच केली जाते. डच गुलाब वाढवण्यासाठी, पॉलीहाऊसमध्ये सुमारे ३२-३५ अंश सेल्सिअस तापमान असणे आवश्यक आहे. हिवाळ्यात पिकाची काढणी करणे फायदेशीर ठरते. डच गुलाबांना भारताबरोबरच जपान, नेदरलँड आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांमध्ये मागणी जास्त आहे.



जर तुम्ही फळे आणि भाज्यांची लागवड करून कंटाळा करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी उपयुक्त आहे. फळे आणि भाजीपाला व्यतिरिक्त गुलाबाची लागवड करून शेतकरी भरघोस नफा कमवू शकतात. शेतकरी पॉलिहाऊसमध्ये डच गुलाबाची लागवड करू शकतात. या फुलाचे वेगळेपण आहे, तज्ज्ञांच्या मते, या फुलाचा रस उसाच्या रसापेक्षा कितीतरी पटीने गोड असतो. यासोबतच बाजारातही भरपूर मागणी आहे. या फुलाचा वापर सजावटीसाठीही केला जातो. या फुलाची लागवड शेतकऱ्यांचे नशीब बदलू शकते. पॉलिहाऊसमध्ये या फुलाच्या लागवडीसाठी अनुदानही उपलब्ध आहे. तज्ज्ञांच्या मते, एक एकरमध्ये पॉलीहाऊस उभारण्यासाठी सुमारे ७० लाख रुपये खर्च येतो.

ज्यावर राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाकडून ५० टक्के अनुदान दिले जाते. या फुलाची लागवड फक्त पॉलीहाऊसमध्येच केली जाते. डच गुलाब वाढवण्यासाठी, पॉलीहाऊसमध्ये सुमारे ३२-३५ अंश सेल्सिअस तापमान असणे आवश्यक आहे. हिवाळ्यात पिकाची काढणी करणे फायदेशीर ठरते. डच गुलाबांना भारताबरोबरच जपान, नेदरलँड आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांमध्ये मागणी जास्त आहे. शेतकरी हे फूल पिकवून परदेशात पुरवठा करू शकतात. केवळ एक एकर शेतात दररोज ४५ ते ५० किलो गुलाबाची फुले येतात. जी चांगल्या किमतीत विकली जाते. या फुलाची लागवड करून शेतकरी बांधवांना दररोज १० ते २० हजार रुपयांचा नफा मिळू शकतो. राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ देखील फुलांच्या उत्पादनावर उत्कृष्ट अनुदान देते.

रशिया आणि युक्रेनच्या युद्धामुळं महागाईचा भडका उडाला. भारतातील भल्याभल्यांचं तर कंबरडं मोडलंच, सोबतच प्रत्येक व्यक्तीला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आजही याची झळ सोसावी लागत आहे. पण रशिया-युक्रेनच्या युध्दामुळं पुण्याच्या मावळमधील मुकुंद ठाकरेंना कमालीचा फायदा झाला आहे. गुलाबातून त्यांनी चांगली कमाई केली आहे.

## शेणखतापासून बनतोय माशांचा चारा

कॉमन कॉर्प आणि कतला वरच्या आणि मध्यम स्तरावर अन्न शोधतात. तर सिल्व्हर कॉर्प आणि नॅनी खालच्या स्तरावर जेवण करतात. म्हणून संपूर्ण तलावाचे विविध स्तरांवर शोषण करण्यासाठी संमिश्र मत्स्यसंवर्धनाचा वापर केला पाहिजे. विशेषत: मत्स्य शेतकरी तलावात जिरे टाकतात मात्र पैशाअभावी त्यांना योग्य प्रमाणात चारा मिळत नाही. त्यामुळे माशांची वाढ वेगाने होत नाही. अशा स्थितीत मत्स्य उत्पादकांना फारसा फायदा मिळत नाही. शेतीसोबतच शेतकरी मत्स्यपालनही मोठ्या प्रमाणावर करतात. यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते. याशिवाय मत्स्यपालनासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदतही केली जाते. काहीवेळा शेतकऱ्यांना मत्स्यपालनाशी संबंधित फारशी माहिती नसल्याने मत्स्यपालनात नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला मत्स्यपालनाशी संबंधित अशा तंत्रांबद्दल सांगणार आहोत, ज्याचा अवलंब करून मत्स्यपालनातून चांगले उत्पादन मिळवू शकता.



मत्स्यपालनासाठी तळ्याची खोली किती असावी? : मत्स्यपालनासाठी तलावाची खोली पाच ते सहा फूट असावी जेणेकरून माशांची वाढ झपाट्याने होईल. पाच ते सहा फूट खोल तलावामध्ये सूर्यकिरण प्लँक्टन उचलतात आणि तलावाच्या पृष्ठभागावर पोहोचतात. त्यामुळे तलावाच्या खोलीपर्यंत प्लँक्टन आढळून येतो. विशेष म्हणजे पाण्याच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर प्लवकांचे प्रमाणही वेगवेगळे असते. वरच्या स्तरावर जास्त प्रकाश पडल्यामुळे एकूण प्लवकांपैकी सुमारे ६० टक्के येथे उपस्थित आहे. तर तलावाच्या मधल्या आणि खालच्या पातळीवर २० टक्के प्लँक्टन उपलब्ध आहे. यामुळे सर्व मासे वेगवेगळ्या स्तरावर अन्न शोधतात.

संमिश्र मत्स्यपालन वापरा : कॉमन कॉर्प आणि कतला वरच्या आणि मध्यम स्तरावर अन्न शोधतात. तर सिल्व्हर कॉर्प आणि नॅनी खालच्या स्तरावर जेवण करतात. म्हणून संपूर्ण तलावाचे विविध स्तरांवर शोषण करण्यासाठी संमिश्र मत्स्यसंवर्धनाचा वापर केला पाहिजे. विशेषत: मत्स्य शेतकरी तलावात जिरे टाकतात मात्र पैशाअभावी त्यांना योग्य प्रमाणात चारा मिळत नाही. त्यामुळे माशांची वाढ वेगाने होत नाही. अशा स्थितीत मत्स्य उत्पादकांना फारसा फायदा मिळत नाही.

शेणामुळे माशांचे वजन वाढेल : जर शेतकऱ्यांकडे माशांचे खाद्य खरेदी करण्यासाठी पैसे नसतील तर ते स्वत: घरी माशांचे खाद्य तयार करू शकतात. यासाठी शेतकरी गाई-म्हशींच्या शेणाचाही वापर करू शकतात. गाईच्या शेणावरही मासे जगू शकतात. शेतकरी थेट तलावात शेण टाकू शकतात. याशिवाय शेळीची विष्ठाही वापरता येते. शेळीची विष्ठा पावडरमध्ये बारीक करून तळ्यात मिसळा, जे चारा म्हणून काम करेल. शेळीची विष्ठा पाण्यात सहज विरघळते, त्यामुळे मासे ते सहज खाऊ शकतात.

सुरुवातीला २ हजार किलो शेण टाका

भारतीय कृषी संशोधन परिषदेने () केलेल्या संशोधनात हे सिद्ध झाले आहे की, शेणात असलेले घटक खाल्ल्याने मासे जलद वाढतात. यामुळेच ने माशांसाठी ग्लोबल गोळ्याही बनवल्या आहेत. याचे कारण म्हणजे शेणात नायट्रोजन मोठ्या प्रमाणात आढळतो आणि मासे ते खातात तेव्हा त्यांचे वजन झपाट्याने वाढते. एक हेक्टरमध्ये मत्स्यशेती सुरू केल्यास प्रथम तलावात २ हजार किलो शेण घाला आणि त्यानंतर दरमहा १ हजार किलो शेण घाला. त्यामुळे माशांचे वजन झपाट्याने वाढेल आणि तुमचे उत्पन्नही वाढेल.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६७३ : मराठा साम्राज्याचे सरनौबत प्रतापराव गुजर यांनी बहलोलखान पठाणाविरुद्ध मोठी लढाई जिंकली.
१८९२ : जनरल इलेक्ट्रिक कंपनीची स्थापना झाली.
१८९५ : साली स्वातंत्र्यपूर्व भारतातील थोर समाजसुधारक व क्रांतिकारक लोकमान्य टिळक यांनी सर्वप्रथम कोकणातील रायगड किल्ल्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज याची जयंती साजरी केली.
१९१२ : आर. एम. एस. टायटॅनिक हे जहाज उत्तर अटलांटिक महासागरात बुडाले.
१९२३ : मधुमेह असणा-यांना इन्सूलिन वापरण्यासाठी सामान्यतः उपलब्ध झाले.
१९४० : दुसरे महयुद्ध नाझी जर्मनीच्या ताब्यात असलेल्या नॉर्वेतील नॉर्विक शहरावर दोस्त राष्ट्रांच्या फौजांनी हल्ला सुरू केला.
१९९४ : भारताने गॅट करारास मान्यता दिली.
१९९७ : मक्केपासून सहा किमी अंतरावरील मिना (सौदी अरेबिया) येथे हज यात्रेकरुंच्या तंबूला आग लागून किमान ३०० जण मृत्युमुखी पडले.
१९९८ : थम्पी गुरु म्हणून प्रसिद्ध असलेले फ्रेडरिक लेंज यांचे निधन.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४५२ : लियोनार्दो दा व्हिंची, इटालियन गणितज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ, चित्रकार.
१४६९ : गुरू नानक देव शिख धर्माचे संस्थापक आणि पहिले गुरू (मृत्यू: २२ सप्टेंबर १५३९)
१५६३ : शिखांचे पाचवे गुरु गुरु अर्जुन देव यांचा जन्मदिन.
१७०७ : स्विस गणितज्ञ लिओनार्ड ऑयलर यांचा जन्म. (मृत्यू: १८ सप्टेंबर १७८३)
१७४१ : चार्ल्स विल्सन पील अमेरिकन चित्रकार, निसर्गवैज्ञानिक व सैनिक (मृत्यू: २२ फेब्रुवारी १८२७)
१८९३ : नरहर रघुनाथ तथा न. र. फाटक चरित्रकार, टीकाकार, इतिहास संशोधक, संत साहित्याचे अभ्यासक व लेखक (मृत्यू: २१ डिसेंबर १९७९)
१८९४ : निकिता क्रूश्चेव्ह सोविएत युनियनचे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ११ सप्टेंबर १९७१)
१९०१ : अजय मुखर्जी भारतीय राजकारणी यांचा जन्म.
१९१२ : मल्हार सदाशिव तथा 'बाबूराव' पारखे उद्योजक व वेदाभ्यासक (मृत्यू: १३ जानेवारी १९९७)
१९१२ : किम सुंग (दुसरे) उत्तर कोरियाचे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ८ जुलै १९९४)
१९२२ : गीतकार हसरत जयपुरी यांचा जन्म. (मृत्यू: १७ सप्टेंबर १९९९)
१९३२ : कवी सुरेश भट यांचा जन्म. (मृत्यू: १४ मार्च २००३)
१९४० : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय शिखर घराण्यातील शास्त्रीय गायक व सारंगी वादक उस्ताद सुलतान खान यांचा जन्मदिन.
१९६३ : भारतीय क्रिकेटपटू मनोज प्रभाकर यांचा जन्म.
१९७२ : प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेत्या, क्रिकेट ग्लॅमर, फॅशन मूर्ती मंदिरा बेदी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९४ : मोरेश्वर रामचंद्र पराडकर उर्फ 'मोरोपंत' पंडीतकवी चैत्र शु. १५ (जन्म: ? ? १७२९)
१८६५ : अब्राहम लिंकन, अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचा राष्ट्राध्यक्ष.
१९१२ : जगप्रसिध्द टायटॅनिक बोटीला धक्का लागून जलसमाधी मिळाल्याने अनेक लोकांचा मृत्यू.
१९१२ : एडवर्ड जे. स्मिथ आर. एम. एस. टायटॅनिक जहाजाचा कप्तान (जन्म: २७ जानेवारी १८५०)
१९८० : जेआँ-पॉल सार्त्र फ्रेन्च लेखक, कवी, तत्त्वज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २१ जून १९०५)
१९९० : ग्रेटा लोविसा गुस्ताव्हसन ऊर्फ 'ग्रेटा गार्बो' हॉलिवूड अभिनेत्री (जन्म: १८ सप्टेंबर १९०५)
१९९५ : पंडित लीलाधर जोशी तत्कालीन मध्यभारत राज्याचे पहिले मुख्यमंत्री (जन्म:)
१९९८ : पॉल पॉट कंबोडियातील २० लाख नागरिकांच्या हत्याकांडास जबाबदार असणारा 'ख्मेर रुज'चा नेता (जन्म: १९ मे १९२५)
२०१३ : वि. रा. करंदीकर संत साहित्याचे अभ्यासक (जन्म: २७ ऑगस्ट १९१९)

## शेतात जमिनीचा ओलावा कसा टिकवून ठेवावा?

चांगल्या पिकासाठी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे मातीची गुणवत्ता. शेतातील मातीचा दर्जा चांगला असेल तर शेतकऱ्यांचे पीकही बऱ्यापैकी येते. भरघोस पीक येण्यासाठी जमिनीत ओलावा असणे आवश्यक आहे. जमिनीत ओलावा टिकवण्यासाठी शेतकरी येथे नमूद केलेल्या उपायांचा अवलंब करू शकतात. शेतकरी बांधवांनी जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी पीक ओळींमध्ये खोल नाले करावेत.

शेतातून चांगले उत्पादन घेण्यासाठी जमिनीत ओलावा असणे आवश्यक आहे. जमिनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी शेतकरी खाली नमूद केलेल्या उपायांचा अवलंब करू शकतात. आपला देश हा कृषीप्रधान देश आहे. देशाची मोठी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. चांगल्या पिकासाठी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे मातीची गुणवत्ता. शेतातील मातीचा दर्जा चांगला असेल तर शेतकऱ्यांचे पीकही बऱ्यापैकी येते. भरघोस पीक येण्यासाठी जमिनीत ओलावा असणे आवश्यक आहे. जमिनीत ओलावा टिकवण्यासाठी शेतकरी येथे नमूद केलेल्या उपायांचा अवलंब करू शकतात. शेतकरी बांधवांनी जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी पीक ओळींमध्ये खोल नाले करावेत. याशिवाय पावसाचे पाणी साठवण्यासाठी जमिनीत ठिकठिकाणी झाडांच्या ओळींमध्ये छोटे खड्डे करावेत. तसेच शेतकरी बांधवांनी वेळोवेळी शेतातील तण काढून टाकावे जेणेकरून पिकांसाठी जमिनीत ओलावा टिकून राहील. उतार असलेल्या जमिनीवर बंधारे बांधून मातीची धूप रोखा. बांधकाम आणि खाणकामात मातीची धूप होण्यापासून संरक्षण करण्यावर भर दिला पाहिजे. उताराच्या विरुद्ध शेतात नांगरणी करू नका. अन्न, वस्त्र, निवारा आणि औषध याशिवाय माती हे जीवनाचे मुख्य साधन आहे. त्यामुळे त्याचे संवर्धन करणे अत्यंत गरजेचे आहे. मातीचे नुकसान होण्यापासून संरक्षण करण्यासाठी आणि त्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी ५ डिसेंबर रोजी जागतिक मृदा दिन साजरा केला जातो. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करून तज्ज्ञांकडून शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांना विविध माहिती दिली जाते.

## महामानवास अभिवादन



माजलगांव:- शहरामध्ये विविध ठिकाणी दि १४ एप्रिल रविवार रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित अभिवादन करताना रमेशराव आडसकर. आरुण राऊत, अँड भानुदास डक, डॉ.अशोकराव तिडके,ज्ञानेश्वर सरवदे, दिपक मेंडके,सचिन डोंगरे, राजेश घोडे, ईश्वर अप्पा खुर्पे,भास्कर शिंदे, दता कांबळे, राम गायकवाड, दता डाके, भिमराव टाकणखार, गोरख टाकणखार, बाळासाहेब क्षिरसागर, सचीन जावळे, मारोती साळवे, विशाल गणकवार, मयुर भिसे, अविनाश कांडुरे, कपिल सोनपसारे, सुधाकर वाघमारे, अमोल शेरकर, भैंय्या प्रधान, बाळा घाडगे, अभिजीत देडे यांची उपस्थीती होती.



माजलगाव : भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार,महामानव,भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती निमित्त दि १४ एप्रिल रविवार रोजी लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि सुंदरनगर तेलगाव कार्यालयात प्रतिमेस विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड समवेत लिगल प्रमुख अशोक पाटील,मार्केटिंग मॅनेजर विष्णू पंत साबळे,दासराव मोरे,महादेव मुरकुटे, संतोष लगड, नागोराव निर्मळ,गोरख वाशिंबे आदी.



माजलगाव: येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये १४ एप्रिल रविवार रोजी सकाळी ११:०० वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जयंती उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे संचालक अमोल जाधव मा. प.स.सदस्य मुरलीधर साळवे व सर्व अधिकारी कर्मचारी बांधव उपस्थित होते



बीड : महामानव, भारतरत्न, विश्ववंदनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील पूर्णाकृती पुतळ्यास भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. व जयंतीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी अँड सर्जेराव तांदळे, अमृत काका सारडा, अजय सवाई, डॉ लक्ष्मण जाधव, बालाजी पवार, अनिल चांदणे, शेख ईशादभाई, केशव बडे, कपिल सौदा, बद्रीनाथ जटाळ, अमर सानप सह आदी उपस्थित होते.

# रामायणातून त्यागाची, संस्काराची शिकवण मिळते - जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम यांच्या राम कथेतून त्यागाची आणि संस्काराची शिकवण मिळते. वडीलधार्यांचा मान सन्मान आणि शब्दाला किती किंमत असते हे रामायणातून शिकायला मिळते. रामगडावर सुरू असलेल्या ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या सुरेल आणि भक्तिमय रामकथेला उपस्थित राहता आले हा योग आला असल्याचे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी म्हटले. बीड पासून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र संस्थान रामगड या ठिकाणी गेल्या ४५ वर्षापासून नारळी अखंड हरिनाम सप्ताह व संगीत राम कथा आयोजित करण्यात येत असते. यावर्षी दि.१० एप्रिल पासून अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात झाली आहे. दिनांक १३ रोजी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या राम कथेला माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर उपस्थित होते.

पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, आज मी फक्त समाधान महाराज यांची राम कथा ऐकण्यासाठी मुद्दामहुन आलो आहे समाधान महाराजांच्या रसाळ वाणीतून राम कथा ऐकण्याची इच्छा होती. रामगडावर मी येतच असतो परंतु आज राम कथेला मुद्दाम म्हणून आलो आहे. रामायणा मधून त्यागाची



शिकवण मिळते भोगाची नव्हे, मर्यादा पुरुषोत्तम रामाच्या अंगी असलेले गुण अंगिकारावेत अशी ही रामकथा आहे. गेल्या काही वर्षांपासून या गडावर भक्तीचा सागर दिसू लागला आहे. या परिसरात श्रद्धाळू भाविक आहेत गडाला खूप सहकार्य करत आहेत भक्ती आणि शक्तीचा सागर या ठिकाणी जमू लागला आहे. यावर्षी आयोध्येत रामलला स्थापित झाल्यामुळे देशभरात मोठ्या उत्साहात रामनवमी साजरी होणार आहे. समाधान महाराज सहज सोप्या भाषेत राम कथा सांगून प्रबोधन करत आहेत.

बीड जिल्ह्यातील आपला माणूस राज्यात आणि राज्याच्या बाहेर नावलौकिक मिळवत असल्यामुळे खूप समाधान वाटते आणि अभिमान देखील वाटतो असे ते म्हणाले.

यावेळी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा म्हणाले की, जो सर्वांचे आशीर्वाद घेत असतो तो लोकांचा नेता असतो तसे जयदत्त आण्णा आहेत. जिथे-जिथे आध्यात्मिक साधना चालते तिथे आण्णा आशीर्वाद घेण्यासाठी येतातच, म्हणूनच असा नेता सर्वांना हवा असतो. मी लहानपणी बीड जिल्ह्याच्या तत्कालीन खासदार केशरकाकू क्षीरसागर यांच्या केज आगमनाच्या वेळी मुद्दामहुन हजर असायचो. काकूंचे आणि आमच्या घराचे निकटचे संबंध होते. लहानपणी ठीक पण तरुण पणी देखील आम्ही काकूंच्या प्रचारात मग्न असायचो, त्यामुळे क्षीरसागर घराण्याशी एक वेगळे नाते निर्माण झाले आहे. जयदत्त आण्णा क्षीरसागर अत्यंत संयमी आणि कुशल असे नेतृत्व आहे धार्मिक भावना जोपासत सर्व समाजाला बरोबर घेऊन जाणारा नेता म्हणून त्यांची महाराष्ट्रात ओळख आहे याचा मी देखील ठिकठिकाणी अनुभव घेतो आहे असे सांगून त्यांनी बालपणीच्याही आठवणी जागृत केल्या.

यावेळी रामगडाचे मठाधिपती महंत स्वामी योगिराज महाराज, अरुण डाके, मसुराम कदम महाराज, गणपत डोईफोडे, अरुण बोंगाणे, कालीदास नवले, अमोल चव्हाण, सखाराम मस्के, कोंडीराम निकम, विठ्ठल कथले, विश्वंभर सावंत, जितेंद्र बोबडे, बाबासाहेब शिंदे, नागेश धट, समाधान शेलार, खंडू चादर, दीपक पाटोळे, गणेश डोईफोडे, विजय बोबडे, सर्जेराव मोहिते, अशोक भावले, सुरेश वैद्य, ऋषिकेश सावंत, रामभाऊ ढोरमारे, सदाशिव प्रभाळे यांच्यासह परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत द्या - नुमान चाऊस

माजलगाव । प्रतिनिधी



बीड जिल्ह्यात गेल्या काही दिवसांत ठिकठिकाणी झालेल्या गारपीट, अवकाळी पाऊस व प्रचंड वाऱ्यामुळे शेतीचे, गुरांचे व शेतकऱ्यांच्या मालमत्तेचे अतोनात नुकसान झाले आहे. अगोदरच दुष्काळी परिस्थिती असताना तुरळक ठिकाणी शेत उत्पन्न निघालेले असताना त्याचे वादळी वाऱ्याने, गारपिटीने नुकसान झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर अजून वाईट परिस्थिती आली आहे. आंबा, डाळिंब, मिरची, टोमॅटो, ज्वारी, बाजरी, कांदा व फळबाग हे नष्ट झालेले आहेत.

तरी संकटात सापडलेल्या या शेतकऱ्यांना प्रशासनाने तात्काळ ५०,०००/ हाजार हेक्टरी नुकसान भरपाई द्यावी. ज्यांची घर पडली, गुरांच्या गोठ्यांचे व जनावरांचे नुकसान झाले आहेत अश्या शेतकऱ्यांना आठ ते दहा दिवसात नुकसान भरपाई द्यावी,संबंधित शेतकऱ्यांच्या पाल्यांची शैक्षणिक फी माफ करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी केली आहे. नसता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून जिल्हाभरात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल.

## सिद्धेश्वर विद्यालयात भारतरत्न डॉ बाबासाहेबांना अभिवादन

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले सर,प्रमुख अतिथी क्रिडाध्यापक पंडित मेंडके तर व्यासपीठावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, विभाग प्रमुख रवींद्र खोडवे,कमलाकर झोडगे, सदाशिव ढगे, परमेश्वर आदमाने इत्यादी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात सांघिक पद्याने झाली. सांघिक पद्य चैतन्य आहेर यांनी



सांगितले. यानंतर पंडित मेंडके यांनी सांगितले की, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दीन, दु:खीत, सामाजिक विकासापासून कोसो दूर असलेल्या समाजाच्या उत्कर्षासाठी आपले जीवन व्यतीत केले. समाजातील घटकाने अन्यायाला वाचा फोडली पाहिजे,शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची शिकवण आहे. अन्याय करणाऱ्या पेक्षा अन्याय सहन करणारा अधिक गुन्हेगार आहे म्हणून निर्भयपणे वाघासारखे जगावे ही शिकवण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या आचरणातून समाजाला दिली. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक अनंतराम कोपले सर यांनी सांगितले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर मार्गक्रमण करत त्यांच्या विचारांचे आपल्या आचरणात आणले पाहिजे. यानंतर माजलगाव शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर भागातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती स्वप्ना देशपांडे यांनी केले,आभार प्रदर्शन सदाशिव ढगे, सुत्रसंचलन श्रीमती प्रज्ञा देशपांडे यांनी केले कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली कल्याण मंत्र आदिनाथ कुंडकर यांनी सांगितला. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## कवडगाव येथे प्रशासन दाखल; तहसीलदारांनी केली नुकसानीची पाहणी

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे काल झालेल्या वादळी वाऱ्यासह गाराच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकासह नागरिकांच्या घरावरील पत्रे उडून गेल्याने मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाले आहे..

वडवणी तालुक्यामध्ये गेल्या दोन दिवसापासून पडत असलेल्या वादळी वाऱ्यासह गारांच्या पावसामुळे कवडगाव येथील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाले असून लाईटच्या तारा तुटल्या आहेत मोठ मोठे झाडे कोसळले आहेत. तसेच गावातील अनेक नागरिकांच्या घरावरील पत्रे उडून गेले आहेत या अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह गारांच्य तडाख्यामुळे शेतातील जवारी गहू बाजरी मोसंबी टरबूज खरबूज आंब्या सह आदी पिकांचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाले असुन पावसामध्ये झालेल्या नुकसानीच्या बातम्या दैनिक नवराष्ट्र पेपर सह इतर दैनिकात प्रकाशित होताच वडवणी येथील तहसीलदार दत्ता भारस्कर यांनी तात्काळ शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतीच्या नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करून पंचनामा केला तसेच नागरिकांच्या घरावरील उडून गेलेल्या पत्रे व या तडक्यात अनेक भिंती कोसळून मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाले आहे.

या गावातील सर्वच नुकसानग्रस्त ठिकाणी तहसीलदार यांनी स्वत: भेट देऊन पाहणी करत पंचनामा करत महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यास व विद्युत विभागातील कर्मचाऱ्याना तसेच ग्रामसेवक यांना योग्य त्या सूचना तहसीलदार यांनी दिल्या नुकसान ग्रस्त शेतकरी व नागरिक यांना योग्य तो लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी तहसीलदार दत्ता भारस्कर यांनी सांगितले. यावेळी गावातील नागरिकासह प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.



कवडगाव येथे काल झालेल्या वादळी वाऱ्यासह गारांच्या पावसामुळे शेतामधील गहू जवारी आंबे मोसंबी बाजरी टरबूज खरबूज सह आदी पिकांचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाले आहे. तसेच गावातील गोरगरीब नागरिकांच्या घरावरील पत्रे उडून घरातील अनेक मौल्यवान वस्तूचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुसते कागदावरच पंचनामे न करता या सर्व नुकसानग्रस्तांना तात्काळ आर्थिक मदत द्यावी.

**सतीष आभिमान सोनवणे ग्रा.पं. सदस्य कवडगाव**

## जयभवानी महाविद्यालयात मतदान जनजागृती

पाटोदा/ प्रतिनिधी

शासनाच्या परि पत्रका नुसार शहरातील जयभवानी कॉलेज येथे मतदान जन जागृती मोहीम राबवण्यात आली. यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ लोखंडे बि बी यांनी मतदानाचे महत्त्व विविध उदाहरणे देऊन पटवून दिले. जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विश्वास कदम होते तर व्यासपीठावर इंग्रजी विभाग प्रमुख प्रा विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ लोखंडे यांनी नमूद केले की मतदानामुळेच लोकशाही शासन व्यवस्था

मजबूत होते, तर मतदानाच्या माध्यमातून नागरिकांना हवा असलेला राजकीय पक्ष सत्तेत आणता येतो. आपणास हवी असलेली विचारधारा राजकीय सत्तेच्या माध्यमातून अमलात आणता येते. मतदानाकडे दुर्लक्ष करणे हे लोकशाहीसाठी घातक असल्याचे



देखील त्यांनी आवर्जून नमूद केले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ कदम महणाले की जोपर्यंत देशातील पांढरपेशी बुद्धीजीवी वर्ग मतदानाबाबत स्वतः जागृत होऊन इतरांना जागृत करणार नाही, तोपर्यंत मतदानाच्या माध्यमातून होणारी वैचारिक क्रांती होऊ शकणार नाही असेही त्यांनी नमूद केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी विकास मंडळाचे समन्वक डॉ वंदन जाधव यांनी केले तर प्रा.जोती रकटे यांनी आभार मानले .या कार्यक्रमास महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## ज्ञानराधाच्या ठेवीदारांना २१ मे पर्यंत ठेवी मिळणार : कुटे

बीड । प्रतिनिधी

गेल्या सहा महिन्यांपासून पैसे मिळण्याच्या प्रतिक्षेत असलेल्या ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या ठेवीदारांना अशेचा किरण मिळाला असून २१ मे पर्यंत सर्व प्रक्र ीया पूर्ण करून ठेवीदारांना त्यांचे पैसे देणार आहे. यामध्ये कसल्याही प्रकारचा आता बदल होणार नसल्याची माहिती ज्ञानराधाचे चेअरमन सुरेश कुटे यांनी दिली.

पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकुर यांच्या मार्गदर्शनाखाली ठेवीदार कृती समितीची शनिवारी बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी शिष्टमंडळात ठेवीदार कृती समितीचे प्रा. सचिन उबाळे, ज्येष्ठ सी.ए. सत्यनारायण लोहीया, विधिज्ञ अॅड. शशिकांत सावंत, कुटे ग्रुपच्या अर्चना सुरेश कुटे यांच्यासह ठेवीदारांचा समावेश होता. यावेळी ठेवीबाबत माहिती देताना सुरेश कुटे म्हणाले, गेल्या सहा महिन्यांपासून आमचे प्रयत्न ठेवी परत करण्यासाठीच होते. वेगवेगळ्या माध्यमातून केलेल्या प्रयत्नांना आता यश मिळाले असून कुटे ग्रुपला १० हजार कोटी रूपये मंजूर झाले आहेत.

यापैकी १२५० आणि ७५० कोटी रूपये कुटे ग्रुपच्या खात्यावर जमा झाले असून आलेला निधी त्रुटींचे निराकरण झाल्यानंतर तातडीने ज्ञानराधा मल्टीस्टेटकडे वर्ग करून तो खातेदारांना दिला जाणार असल्याचे सुरेश कुटे यांनी सांगीतले.

### सर्वांचे पैसे देणारच

ठेवीदारांनी कोणत्याही ग्राहकांनी अफवांवर विश्वास न ठेवता संयम बाळगावा,सुरूवातीला दिलेले धनादेशाची रक्कमही मे महिन्यांतच दिली जाणार आहे. आजपर्यंत जो विश्वास ग्राहकांनी आमच्यावर ठेवला आहे,तो येणाऱ्या काही दिवसांपर्यंत ठेवावा असे आवाहन सुरेश कुटे यांनी केले आहे.

## युसूफवडगांव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील भिमनगरमध्ये आज भारतीयघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंतीनिमित्ताने भिमनगरमध्ये महामानवाला अभिवादन करण्यासाठी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरपंच महेश गायके, उमाकांत भुसारी,जेष्ठ शिक्षक राजाभाऊ खरबड, उपसरपंच महेश लामतुरे, शिवदास थळकरी, पशुवैद्यकिय अधिकारी डॉ.गुंडाप्पा थळकरी यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्रिसरण,पंचशील व बुद्ध वंदना घेऊन महामानवास अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रा.प.सदस्य मन्मथ पाटील, अशोक चोपणे, काशीनाथ खरबड, दादा निकम, चंद्रकांत खरबड, प्रविण वैरागे, संजय लांडगे, शिवदास डोंगरे, चेअरमन अरूण चोपणे. व्हाईस चेअरमन महादेव मोडवे, सचिन जावळे, अरूण राऊत, अमोल पाटील, विकास जाधव, बापु चोपणे, शिवहार थळकरी, मेजर गणेश लामतुरे, भैय्या सावंत, प्रा.मल्लिकार्जुन गडकर, चंद्रकांत थळकरी, किरण सातपुते, अनिल उजगरे, जयराज निशिगंध, अनंत सातपुते यांच्यासह मोठ्या संख्येने बौद्ध बांधव व माता भगिनी उपस्थित होत्या.

# चकलांब्यात यावर्षी हा स्वर्ग सात पावलांचा

बीड । प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी चैत्र पौर्णिमेला चकलांबा येथे श्री रोकडेश्वर जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे,तीन दिवस चालणाऱ्या या जन्मोत्सवानिमित्त दि २३ एप्रिल रोजी चैत्र पौर्णिमेच्या दिवशी प्रसिद्ध लेखक मधुसूदन कालेलकर लिखित ३ अंकी सामाजिक नाटक हा स्वर्ग सात पावलांचा सादर करण्यात येणार आहे,जन्मोत्सवाची जय्यत तयारी सुरू असून प्रेक्षकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन रोकडेश्वर प्रासादिक नाट्य मंडळाने केले आहे.

श्री रोकडेश्वर प्रासादिक नाट्य मंडळ सहर्ष सादर करीत आहे साहित्य सम्राट मधुसूदन कालेलकर लिखित ३ अंकी कौटुंबिक सामाजिक नाटक ''हा स्वर्ग सात पावलांचा'', सादर होत आहे. अत्यंत कौटुंबिक हृदयस्पर्शी



असणारे या नाटकातील मुख्य भूमिकेत संदीप पारगावकर, डॉ. विजयकुमार सुलाखे, एस. के. देशमुख सर, सुभाष चोपडे, दर्शन नाईक, मयूर कुलकर्णी, पल्लवी कुलकर्णी, प्रतीक्षा कुलकर्णी, मैथिली मुळे, नाईक आणि बालकलाकाराच्या अप्रतिम हृदयस्पर्शी भूमिकेत कु. गाडेकर हे कलाकार आपली भूमिका सादर करणार असून,कौटुंबिक हृदयस्पर्शी असणारे हे नाटक २३ एप्रिल रोजी, मंगळवारी, रात्री ८ वाजता श्री रोकडेश्वर नाट्यनगरी चकलांबा येथे होत आहे. या नाट्यप्रयोगाचे दिग्दर्शन इंजि. संतोष पारगावकर हे करत असून या नाटकाचे संगीत प्रा. सतीश सुलाखे, सौ.सुरश्री सराफ आणि प्रशांत सुलाखे हे करत आहेत तर सूत्रधार धनंजय सुलाखे तर या नाटकाचे प्रमुख मार्गदर्शक श्रीयुत प्रशांत जी भालेराव हे आहेत. सूत्रसंचालन उदय सुलाखे हे करत असून नाटकाच्या निर्मितीमध्ये श्रीयुत एस एम देशमुख, शामराव कुलकर्णी, प्रकाशराव देशपांडे, दिलीपराव कुलकर्णी, मधुकर राव मुळे, सुरेंद्र सुलाखे, अभय देशपांडे, नंदकुमार मुळे, अनिकेत मुळे, गणेश कुलकर्णी, डॉ. विजयकुमार कुलकर्णी हे पहात आहेत तर नाटकाची पंचपदी गायन सुधाकर सुलाखे , रमाकांत देशपांडे, राजेंद्र मुळे, कालिदास चोपडे, श्रीकृष्ण नाईक यामध्ये सहभागी आहेत. हा जन्मोत्सव उत्सवात पार पाडण्यासाठी श्रीयुत दिलीप देशपांडे ,शिरीष मुळे, पुरुषोत्तम कुलकर्णी ,किशोर देशमुख ,दीपक सुलाखे , विशाल कुलकर्णी, श्याम सुलाखे,अनिल सुलाखे ,शिरीष सुलाखे, योगेश कुलकर्णी, हे परिश्रम घेत आहेत.हा होणारा नाट्यप्रयोग पाहण्यासाठी प्रेक्षक व भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन श्री रोकडेश्वर प्रासादिक नाट्य मंडळाने केले आहे.

# धारूर येथे मराठा युवकांच्या रोषाचा फटका नियोजित मार्ग बदलून सभास्थळ गाठले

## महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ कार्यकर्ता मेळावा संपन्न

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

महा युतीच्या च्या बीड लोकसभा उमेदवार उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ आयोजीत कार्यकर्ता मेळावा धारूर येतील नर्मदा जिनींग वर आयोजीत केला होता.या मेळाव्याला समबोधित करताना त्यांनी येणाऱ्या निवणुकीत मतदान करण्याचे आव्हान केले.बीड जिल्हा मध्ये जातीपाती वर निवडणूक लढणार नसून विकासाच्या मुद्दवार लढणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले बीड जिल्हातील दहा हजार तरुणांना रोजगार निर्मिती करनार तसेच एक मोठे मल्टिस्पेशालिस्ट हॉस्पिटल उभरारणार त्या साठी जमीन दान करणार .मी सर्व समज घाटकासाठी काम करते आणी करणार.



महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या वर टीका करताना त्यांनी जिल्हा परिषेत काम करत असताना काय दिवे लावले हे तपासून पहा ,टक्केवारी वर काम करणाऱ्या ना त्याची जागा दाखवा असे आव्हान त्यांनी कार्य करत्याना केले.

महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना धारूर शहरात मराठा समाजाच्या रोशाचा सामना कारवा लागलाला.

बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे या लोकसभेच्या प्रचारार्थ आज धारूर शहरात आल्या होत्या छत्रपती शिवाजी महाराज चोक परिसरात शेकडो मराठा एकत्र येत एक मराठा लाख मराठा च्या घोषणा दिल्या मुळे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरामध्ये परत न येता मार्ग बदलू न . कार्य करता मेळावायचे ठिकाण जवळ केले.

या कार्यकर्ता मेळाव्यास माजलगावचे माजी आमदार आर टी देशमुख रमेश आडसकर जयसिहं सोळंके डॉ.स्वरूपसिहं हजारी माधव निर्मळ राम कुलकर्णी यांची प्रमुख उपस्तीथी होती तसेच महायुतीचे सर्व पदाधिकारी नेते व कार्य कर्ते उपस्तिथ होते

# दबावाला बळी पडू नका, इंडिया आघाडीला मतदान करा -सोनवणे

## आष्टी तालुक्यात गावभेटी, कॉर्नर बैठकांमधून आवाहन

**आष्टी । प्रतिनिधी**

सरकारने शेतीमालाला भाव दिला नसून विद्यमान खासदारांनी दहा वर्षाच्या कार्यकाळात विकास निधी खर्च केला नाही. तो निधी परत जाण्याची वेळ मतदार संघावर आली. आता मते मागण्यासाठी गावात येणाऱ्या उमेदवाराला खासदारांचा विकास निधी कुठे गेला ? असा प्रश्न विचाराला पाहिजे. कोणाच्या ही दबावाला बळी पडू नका, इंडिया आघाडीला मतदान करा. असे आवाहन बीड लोकसभेचे इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी केले.

आष्टी तालुक्यात शुक्रवारी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे व महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी गावभेटी देत मतदारांशी संवाद साधून कॉर्नर बैठका घेतल्या. या बैठकीत



बजरंग सोनवणे हे बोलत होते. यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर, किशोर हंबर्डे, विधानसभा प्रमुख रामभाऊ खाडे, परमेश्वर शेळके, आपचे डॉ. नाथ, काँग्रेसचे रवि ढोबळे, सचिन वारूळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना बजरंग सोनवणे म्हणाले की, कुणाच्या ही दादागिरीला बळी पडण्याची आवश्यकता नसून आता जनताच दादागिरी मोडीत काढणार आहे. आम्ही ही निवडणूक जातीपातीवर नव्हे तर विकासाच्या मुद्द्यावर लढवित आहोत. आरक्षणाचा लढ यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करीन. अशी ग्वाही देत पुढारी विरोधकासोबत तर जनता आमच्यासोबत आहे. ज्यांना आपल्या बापजाद्यानी उभारलेला कारखाना चालविता आला नाही, ते काय जिल्ह्याचा विकास करणार असा टोला त्यांनी लगावला.

त्यांनी चिंचपुर (रे), डोके वस्ती, मातोळी, आष्टा फाटा, जामगाव वस्ती, जामगाव, वाळूंज टाकळसिंग, चिखली, वाकी, शिराळ, कानडी (बु), धीर्डी, निमगाव चोभा, काटवन वस्ती, रुईनालकोल, फत्तेवडगाव, पिंपरी (घु.), घोंगडेवडी, वाहीरा, पारोडी, हातोळन, ढोबळ सांगवी गायकवाड वस्ती, ढोबळ सांगवी, सुंभेवाडी येथे भेटी व कॉर्नर बैठका घेतल्या.

# शेतकऱ्यांचे अश्रू पुसायला बजरंग सोनवणे शेतकऱ्यांच्या बांधावर

## धारूर तालुक्यातील गारपीटग्रस्त भागांची केली पाहणी

**बीड-वडवणी । प्रतिनिधी**

बीड लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी धारूर तालुक्यातील गारपीटग्रस्त भागात बांधावर जाऊन पाहणी करीत शेतकऱ्याचे सांत्वन केले. शासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी देखील सोनवणे यांनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बाप्पा सोनवणे हे १४ एप्रिल रोजी धारूर तालुक्यात गारपीटग्रस्त भागाच्या दौऱ्यावर होते. मागील दोन दिवसापूर्वी प्रचंड गारपिट होऊन शेतातील उभ्या पिकांसह फळबागांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले आहे. अशा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे अश्रू



पुसण्यासाठी बजरंग सोनवणे हे प्रचारातून वेळ काढून थेट बांधावर पोहचले. यावेळी गारपीटग्रस्त शेतकरी बांधवानी आपल्या झालेल्या नुकसानीची व्यथा सोनवणे यांना सांगत मदत मिळवून देण्याची अपेक्षा व्यक्त केली झालेले नुकसान पाहून व्यथित झालेल्या बजरंग बप्पानी जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधत झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी यांनी केली आहे. यावेळी त्यांच्यासोबत काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर आंधळे , शिवसेना उबाठा गटाचे तालुका अध्यक्ष विनायक मुळे , आम आदमी पक्षाचे तालुका अध्यक्ष धम्मपाल डावरे , मा ह चे तालुकाध्यक्ष विष्णूजी मुजमुले यांची उपस्थिती होती

# संजय जाधवांची जवळीक वाळूवाल्यांशी, वाळू खाणे अति झाले आता माती करण्याची वेळ आलीये, धनंजय मुंडेंचा घणाघात

**परभणी । प्रतिनिधी**

संजय जाधव हे दोन वेळेस आमदार आणि दोन वेळेस खासदार राहिले, पण त्यांनी परभणी जिल्ह्याचा विकास केलाच नाही. संजय जाधव यांची जवळीक वाळू वाल्यांशी आहे. त्यामुळे आता तुम्हीच ठरवायचं आहे की तुम्हाला वाळू खाणारा खासदार पाहिजे की विकास करणारा खासदार पाहिजे. त्यांचे वाळू खाणे आता अति झाले आहे. त्यांची माती करण्याची वेळ आली आहे, अशी प्रखर टीका राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार संजय जाधव यांच्यावर केली आहे.

परभणी शहरातील अक्षदा मंगल कार्यालयात महायुतीच्या वतीने महादेव जानकर यांच्या प्रचारार्थ शहरातील प्रतिष्ठित व्यापारी वकील चार्ट अकाउंटंट यांच्याशी संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला संबोधित करताना कृषी मंत्री धनंजय मुंडे बोलत होते. यावेळी त्यांच्यासोबत माजी मंत्री अर्जुन खोतकर, आमदार मेघन बोर्डीकर, आमदार रत्नाकर गुट्टे, आमदार बाबाजानी दुर्राणी, राजेश विटेकर, प्रताप देशमुख हे प्रमुख उपस्थित होते.

धनंजय मुंडे म्हणाले की, पिढ्या न



पिढ्या परभणी जिल्ह्यातल्या मातीने चांगले चांगले नेते घडवले. ते आमदार झाले, खासदार झाले, मंत्री झाले. ते देशाच्या सर्वोच्च सभागृहात गेले. ते स्वतः मोठे झाले पण परभणी जिल्ह्याचा विकास झाला नाही. परभणी जिल्ह्यातला माणूस मोठा झाला नाही. परभणी जिल्हा हा वैभवशाली जिल्हा आहे. येथील ९०% जमीन पाण्याखाली आहे. गोदावरीचा सर्वाधिक काठ परभणी जिल्ह्यातून वाहतो. सर्वाधिक रेल्वेचे जाळे परभणी जिल्ह्यामध्ये आहे. गोदावरीवर बॅलन्स झाल्यामुळे गोदावरी उन्हाळ्यातही हिरवीगार दिसते. पण या वैभवाचा परभणी जिल्ह्याच्या विकासामध्ये बदल झाला नाही. याचं कारणच परभणीमध्ये खाण पाहिजे की बाण पाहिजे यावरच निवडणूक लढली जाते. पण आता विकासाची जाण असणाऱ्या जानकरांना निवडून द्या, असे धनंजय मुंडे म्हणाले.

या निवडणुकीत जातीपातीचा राजकारण सुरू आहे. ज्या छत्रपती शिवरायांनी अठरापगड जातीच्या मावळ्यांना एकत्र करून स्वराज्याची स्थापना केली. त्याच मातीत आज अशा प्रकारचे गणित राजकारण चालू आहे. त्यामुळे जाती पातीच्या राजकारणाला आपण बळी पडू नका, असेही धनंजय मुंडे म्हणाले. जर जातीच्या नावावर मतदान मागण्याची वेळ माझ्यावर आली तर मी राजकारणातून संन्यास घेईन, पण जातीपातीच्या नावावर मतदार मागून निवडणूक लढणार नसल्याचेही धनंजय मुंडे म्हणाले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षांमध्ये असे काही काम करून दाखवलं की ज्या योजना गरीब माणसापर्यंत येत नव्हत्या त्या गरिबांच्या खात्यावर डायरेक्ट आता पैसे जमा होत आहेत. मोदी यांच्यावर टीका होत आहे की हे सरकार शेतकऱ्यांच्या विरोधातला आहे. पण मी कृषिमंत्री या नात्याने जबाबदारीने सांगतो की मागच्या ७० वर्षात ज्यांनी सत्ता भोगली त्यांना कधीच वाटले नाही की आपण शेतकऱ्यांना काही द्यावे. पण या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना दर महिना २००० असे वर्षाचे बारा हजार रुपये त्यांच्या खात्यावर टाकून शेतकऱ्यांना सहाय्य केले आहे. राज्य सरकारनेही मोदी सरकारच्या या योजनेत आपला हिसाब १२ हजार रुपयांनी वाढवून शेतकऱ्यांना एकूण २४ हजार रुपये मिळत आहेत. ही रक्कम राज्यातील एक कोटी शेतकऱ्यांना मिळत आहेत हे एक कोटी शेतकरी कोण्या एका जातीचे नसून तो सर्वच समाजाचा आहे. सर्वच शेतकऱ्यांचा भल करण्याचे काम मोदी सरकारने केला असल्याचेही धनंजय मुंडे म्हणाले.

# मुंडे यांच्या बजरंगी गुगलीवर पवार बोल्ड -राजेंद्र आमटे

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभा निवडणुकीत स्व. लोकनेते विनायकराव मेटे यांच्या पत्नी ज्योतीताई मेटे यांनी निवडणूक लढवावी व हि निवडणूक शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस च्या तुतारी चिन्ह वर लढवावी अशी मागणी झाल्यावर ज्योतीताई मेटे या पंकजा मुंडे यांच्या विरोधात नक्की निवडून येतील पंकजा मुंडे निवडणुकीत पडल्यातर परळी विधानसभा निवडणुकीत पुन्हा उभ्या राहतील या भीती पोटी धनजंय मुंडे यांनी आपले अतिशय जवळचे मित्र ज्यांची छाती फाडली तर एक छातीत धनजंय मुंडे व दुसऱ्या छातीत अजित दादा असणाऱ्या बजरंग सोनवणे यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लोकसभेचे तिकीट मागणी कार ज्योतीताई मेटे यांना तिकीट मिळू नये



म्हणून धनजंय मुंडे यांनी खेळलेला डाव राजकारणातील चाणक्य समजले जाणारे आदरणीय शरद पवार धनजंय मुंडे यांच्या बजरंगी गुगलीवर आऊट झालेच कसे? हातात आलेली ज्योतीताई मेटे यांच्या रूपाने एक लोकसभेची जागा पवार साहेबांच्या हातून निसटली आहे बजरंग सोनवणे यांच्या ऐवजी पुन्हा विचार करून ज्योतीताई विनायकराव मेटे यांना तुतारीच तिकीट देऊन धनजंय मुंडे यांचा डाव असफल करण्याचे काम पवार साहेबानी करावं ज्योतीताई मेटे यांना तिकीट देल्यावर शंभर टक्के बीडची जागा निवडून येऊ शकते असे प्रतिपादन शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांच्या वतीने प्रसिध्दी पत्रक देण्यात येते.

# शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपने नव्हे तर शरद पवार, उद्धव ठाकरेंच्या पुत्रप्रेमामुळे फुटले -अमित शाह

**भंडारा । प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे आणि शरद पवार हे सतत म्हणत असतात की, भाजपने आमचा पक्ष फोडला. मात्र, या दोघांचेही पक्ष भाजपने फोडलेले नाहीत. तर उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांचे आपापल्या अपत्यांवर असणारे प्रेमच पक्षफुटीसाठी कारणीभूत ठरले, असे वक्तव्य केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी केले. ते रविवारी भंडाऱ्यातील साकोली येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रचारसभेत बोलत होते.

यावेळी अमित शाह यांनी राहुल गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले. त्यांनी म्हटले की, उद्धव ठाकरे आणि शरद पवार म्हणतात की, भाजपने आमचा पक्ष फोडला. पण मी आज महाराष्ट्राच्या जनतेसमोर एक गोष्ट स्पष्ट करतोय की, आम्ही शिवसेना किंवा राष्ट्रवादी काँग्रेस



पक्ष फोडलेला नाही. उद्धव ठाकरे यांच्या पुत्रप्रेमामुळे शिवसेना फुटली आणि शरद पवार यांच्या मुलीवरील प्रेमामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटला, असे अमित शाह यांनी ठणकावून सांगितले.

सध्याच्या घडीला महाराष्ट्रात अर्धी शिवसेना आणि अर्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शिल्लक आहे. या दोघांनी मिळून काँग्रेस पक्षालाही अर्धेमुर्धे केले आहे. हे तीन अर्धवट पक्ष कारभार करु शकतील का? महाराष्ट्राचं भलं केवळ नरेंद्र मोदी आणि भाजप हेच करु शकतात. ही देशाची निवडणूक आहे. पंतप्रधान मोदींनी जगभरात भारताला पुढे नेण्याचं काम केलं आहे, असे अमित शाह यांनी सांगितले.

### पवारांनी भंडारा-गोंदियासाठी काय केलं? शाहांचा सवाल

**साकोली येथील सभेत अमित शाह यांनी शरद पवार यांना लक्ष्य केले. शरद पवार यांना माझा प्रश्न आहे की, तुम्ही सोनिया मनमोहन यांच्या सरकारमध्ये मंत्री होतात. मात्र त्या दहा वर्षात तुम्ही आम्हाला काय दिलं होतं?? भंडारा-गोंदिया साठी काय केलं होतं?, असा सवाल अमित शाह यांनी विचारला. त्यापेक्षा कितीतरी जास्त नरेंद्र मोदी सरकारने महाराष्ट्राने भंडारा-गोदियासाठी केलं आहे, असा दावा अमित शाह यांनी केला.**

# भाजपच्या जाहीरनाम्यातून महागाई, बेरोजगारी गायब : राहुल गांधींची टीका

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

भाजपने रविवारी घोषित केलेल्या संकल्पपत्रावर प्रतिक्रिया देताना, काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपवर तीव्र टीका केली आहे. भाजपच्या जाहीरनाम्यातून महागाई आणि बेरोजगारी हे दोन शब्द गायब असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

राहुल गांधी म्हणाले की, सर्वसामान्य माणसाच्या जीवनाशी संबंधित महत्वाच्या मुद्द्यांवर भाजप कधीही चर्चा करीत नाही. भाजपच्या जाहीरनाम्यात बेरोजगारीच्या प्रश्नावर कुठलेही ठोस आश्वासन दिले नसताना विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीने मात्र देशातील बेरोजगारी दूर करण्यासाठी स्पष्ट योजना



आखली आहे. इंडिया आघाडीने देशात ३० लाख बेरोजगार युवकांची भरती करण्याचे आश्वासन दिले आहे. प्रत्येक सुशिक्षित बेरोजगाराला १ लाखाची स्थायी नोकरी देण्याचा आमचा निर्धार आहे. मोदींच्या भूलथापांना आता युवक बळी पडणार नाही. काँग्रेसचा हात मजबूत करून देशातील युवक वर्ग रोजगार क्रांती घडवून आणणार असल्याचा विश्वास राहुल गांधी यांनी व्यक्त केला.

# आजपर्यंत समाजाचा कितपत उद्धार झाला याचे आत्मचिंतन करूनच मतदान करा -अंबेकर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

ओ बी सी प्रवर्गातील बोटावर मोजता येतील एवढ्या पोट जाती मधील लोकच सत्ते सह नौकऱ्या मध्येही लाभ घेत असल्याने मायक्रो ओबीसी घटकाने आज पर्यंत आपल्या समाजाचा कितपत उद्धार झाला याच आत्मचिंतन करूनच या निवडणुकी मध्ये मतदान करण्याची आवश्यकता असल्याचे मत गुरव समाजाचे कार्यकर्ते व जेष्ठ पत्रकार दत्तात्रय अंबेकर यांनी व्यक्त केले आहे.

देशभरा सह महाराष्ट्रा मध्ये ही लोकसभेची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकी पूर्वी राज्यभरात जे मराठा आरक्षणाचे वादळ पेटल्या गेले, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसींच्या कोट्या मधूनच मराठा समाजाला आरक्षण देण्याची आग्रही भूमिका कायम ठेवली. घटनेच्या दृष्टीने ओबीसी कोट्या मधून हे आरक्षण मिळू शकत नाही आणि राज्य सरकार आरक्षणाचा तिढा सोडवू शकत नाही हे आंदोलन कर्त्या मराठा समाजातील जाणकार मंडळीलाही माहीत आहे आणि या आंदोलनाला विरोध करणाऱ्या ओबीसी समाजातील जाणकार मंडळीलाही माहीत आहे.

या आंदोलनातुन एक निष्पन्न झालं आहे मराठा बांधव त्यांच्या हक्कासाठी लढाई लढत आहेत, आज पर्यंत ज्या ज्या मराठा नेत्यांनी आरक्षणाच्या मुद्यावर समाजाचे नेतृत्व केलं त्यांनी समाजाची फसवणूक करून स्वतःचा स्वार्थ साधला मात्र या आंदोलनातुन मनोज जरांगे यांच्या रूपाने जे नेतृत्व उदयास आले त्या जरांगे पाटील यांची भुमीका समाजा साठी म्हणुन आज तरी निस्वार्थी राहिलेली असल्याने राज्य भरातून मराठा समाज मोठ्या ताकतीने त्यांच्या पाठीशी खांबिर पणे उभा राहिलेला असुन जरांगे पाटील यांचा आदेश म्हणजे ''सर आखों पर'' असल्याने आज राज्यभरातील सर्वच पक्षातील मराठा समाजातील जे लाभार्थी नेते आहेत त्यांच्या पाठीशी समाज जायला तयार नाही.



या उलट ओबीसी आरक्षण वाचावे या साठी छगन भुजबळ हे एकमेव मंत्री रस्त्यावर उतरले, राज्यभरात ज्या ज्या ठिकाणी ओबीसी आरक्षण बचाव मेळावे झाले त्या त्या ठिकाणी छगन भुजबळ व्यतिरिक्त राज्यातील एकही मंत्री अथवा विरोधी पक्षातील नेता भुजबळ यांच्या खांद्याला खांदा लावून आरक्षण बचावच्या लढ्यात रस्त्यावर ऊतरलेला नाही ही बाब बीड जिल्ह्यासह राज्य भरातील ओबीसी प्रवर्गाला माहीत आहे.

ओबीसी आरक्षण बचावासाठी छगन भुजबळ एकाकी लढले या बद्दल त्यांचं कौतुक करावे तेवढे कमीच आहे मात्र या ओबीसीच्या लढ्याला मराठा आंदोलका प्रमाणे जो प्रतिसाद मिळायला हवा होता तो मिळालेला दिसला नाही आणि याला कारणही तसंच घडलं आहे आणि हे वास्तव ओबीसी नेत्यांनाही मान्य करावेच लागणार आहे. आज राज्यात ओबीसी प्रवर्गात ३४६ पोट जाती आहेत आणि या संपूर्ण ओबीसी समाजाला भारतीय जनता पक्षाने स्वतःची व्होट बँक म्हणून गृहीत धरलेले आहे मात्र सत्ताधारी भाजपा हे विसरलेली आहे बहुसंख्येने असलेल्या बोटावर मोजता येतील एवढ्या २ ते ३ ओबीसी मधील पोट जातीचे लोकच सत्तेचा पुरेपूर लाभ घेत आहेत.

याच २ ते ३ पोट जाती मधील लोक सत्तेत आहेत, नौकरी मध्येहि तेच लाभ घेत आहेत, गुत्तेदारी क्षेत्रात ही याच २ ते ३ पोट जातीचा वर चष्मा आहे. मात्र याच ओबीसी प्रवर्गातील साळी, कोळी, कोष्टी, तेली, भावसार, वाणी, शिंपी, नाभिक, परीट, गुरव, जंगम, पांचाळ, फुलारी, रंगारी, सुतार, कासार, विणकर, कुंभार, सोनार, लोहार, शिंपी, बंजारा या सारख्या ज्या मायक्रो ओबीसी जाती आहेत त्यांचा कुणीही तारणहार नसल्याने ना सत्तेचा लाभ मिळाला आहे, ना नौकरी वर्गात आपले स्थान निर्माण करता आले आहे की गुत्तेदारी क्षेत्रात कुठे लाभ मिळालेला नाही. हुकून चुकून मायक्रो ओबीसी घटकातील एखादा नेता सत्तेत गेला असेल, राजकारणात असेल तर तो आपल्या गोरगरीब बांधवासाठी मागे वळून पाहण्यास तयार नाही. हा सर्व प्रकार मायक्रो ओबीसी समाज डोळ्याने पाहतो आहे, दिवसेंदिवस अनुभवतो आहे आणि याच कारणास्तव मायक्रो ओबीसी समाजातील लोकांनी छगन भुजबळ यांच्या ओबीसी बचाव लढ्यात कुठेही आपला सहभाग नोंदवलेला दिसून आलेला नाही. एकूणच राज्य भरातील चित्र पाहिले तर मायक्रो ओबीसी समाजाचे दुःख ना सत्ताधारी समजून घेत आहेत ना विरोधक समजून घेत आहेत. आशा परिस्थिती मध्ये लोकसभेच्या निवडणुका लागल्या आहेत आणि सर्वच उमेदवारांना मतांच्या लाचारी पोटी स्वतःचा स्वार्थ डोळ्या समोर ठेऊन मायक्रो ओबीसीचा पुळका येणार आहे.मायक्रो ओबीसी समजाला विविध प्रकारचे आमिषे दाखवल्या जातील, दाबदडप होईल, त्यामुळेच आशा परिस्थिती मध्ये मायक्रो ओबीसी घटकाने आज पर्यंत आपल्या समाजाचा कितपत उद्धार झाला याच आत्मचिंतन करूनच या निवडणुकी मध्ये योग्य उमेदवारास मतदान करण्याची आवश्यकता असल्याचे मत गुरव समाजाचे कार्यकर्ते व जेष्ठ पत्रकार दत्तात्रय अंबेकर यांनी व्यक्त केले आहे

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायक्षेत्र. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# नवजात बाळांच्या खरेदी-विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश



पुणे । प्रतिनिधी

नवजात बाळांच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार करणाऱ्या महिलांच्या टोळीचा वाकड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. आत्तापर्यंत पाच बालकांची या टोळीने विक्री केली असून, शुक्रवारी (१२ एप्रिल) दुपारी सव्वा चारला जगताप डेअरी येथे ही कारवाई केली असून अटक केलेल्या सहा महिला आरोपी सराईत गुन्हेगार असल्याचे तपासात उघड झाले आहे.

ज्यांना मूलबाळ होत नाही किंवा ज्यांना दोन मुली आहेत आणि मुलगा हवा आहे किंवा ज्यांना दोन मुले आहेत आणि मुलगी हवी आहे, अशी दांपत्ये हेरून एक टोळी नवजात बालकांची खरेदी-विक्री करीत असल्याची माहिती वाकड तपास पथकातील हवालदार वंदु गिरे यांना महिला खबऱ्याकडून मिळाली होती. टोळीतील काही महिला नवजात बालकाची विक्री (तस्करी) करण्यासाठी जगताप डेअरी परिसरात येणार आहेत, असेही गिरे यांना कळले. त्यानंतर सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना याची कल्पना देऊन वाकड परिसरात सापळा रचला. दोन रिक्षातून आलेल्या सहा महिलांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे असलेल्या बाळाबाबत चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. महिलांना पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली असता एका महिलेचे सात दिवसांचे नवजात बालक पाच लाखांना विकल्याची कबुली दिली. त्यांची सखोल चौकशी केली असता, त्यांनी यापूर्वी अशाच प्रकारे लाखो रुपयांसाठी पाच नवजात बालकांची विक्री केल्याचे कबूल केले. आरोपी महिलांना न्यायालयात हजर केले असता १६ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

पुण्यातील एका सुप्रसिद्ध हॉस्पिटलमधील नर्सच्या मदतीने शहरातील काही महिला नवजात बाळांची खरेदी-विक्री व्यवहार करत असल्याचा संशय पोलिसांना आहे. त्या दृष्टिकोनातून सध्या तपास केला जात आहे. या नर्स आणि बाळाचे खरेदी विक्री व्यवहार करणाऱ्या महिलांनी मिळून आतापर्यंत पुणे शहरात पाच नवजात बाळांची विक्री गरजू दाम्पत्यांना केली असे पोलीस तपासात समोर आले आहे. या टोळीतील महिलांनी पुणे शहराबाहेर आणखी कुठे असे व्यवहार केले आहेत का, याचा शोध सध्या वाकड पोलीस घेत आहेत. ज्या दांपत्याला वंध्यत्वाची समस्या आहे, अशा दांपत्याची माहिती हॉस्पिटलमध्ये काम करणारी नर्स या टोळीला देत होती. त्यानंतर या महिला वंध्यत्व समस्या भेडसावत असलेल्या दांपत्यांना मिळून त्यांना पाच ते सात लाखांत नवजात बाळ देण्याचे प्रलोभन दाखवत.

## बालक घेणाऱ्यांवरही कारवाई

या प्रकरणात सध्या वाकड पोलिसांनी सहा महिलांना ताब्यात घेतले असून त्यांच्या विरोधात भादंवि ३७० (३),(४) नुसार गुन्हा दाखल केला आहे. तसेच ज्या दांपत्यांनी या टोळीकडून नवजात बालकांची बेकायदेशीर खरेदी केली, अशा दांपत्यांवरही पोलीस कठोर कारवाई करणार आहेत, अशी माहिती सहायक पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांनी दिली.

## आई-बापच करतात विक्री

टोळीतील महिला आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेले दांपत्य शोधायचे. ज्या दांपत्याकडे दोनपेक्षा जास्त मुले आहेत आणि ज्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची आहे, अशा दांपत्याला पैशाचं आमिष दाखवून टोळीतील महिला गरजवंत दांपत्याला नवजात बाळ विकत .

# भोसरीमधून आढळरावांना एक लाखापेक्षा अधिक मताधिक्य मिळवून देणार -आ. लांडगे




नारायणगाव : : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दहा वर्षांची कारकीर्द चांगली असल्यामुळे तिसर्यांदा ते पंतप्रधान होणार आहेतच; त्यांचे हात बळकट करण्यासाठी शिरूर लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव यांना विजयी करण्यासाठी आपण सगळे कामाला लागूया. भोसरी विधानसभा मतदारसंघातून आढळराव यांना एक लाखापेक्षा अधिकचे मताधिक्य मिळवून देण्याची जबाबदारी माझी, असे प्रतिपादन भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी केले. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतीच भाजपच्या जिल्ह्यातील पदाधिकार्यांची बैठक घेतली.

या बैठकीला आमदार महेश लांडगे, महायुतीचे उमेदवार शिवजीराव आढळराव पाटील, आमदार राहुल कुल, हडपसरचे माजी आमदार योगेश टिळेकर, माजी मंत्री बाळा भेगडे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद, जिल्हा परिषद गटनेत्या आशाताई बुचके, जयश्री पलांडे, आबा तुपे, जयसिंग एरंडे, डॉ. ताराचंद कराळे, राम गावडे, संतोष खैरे आदींसह शिरूर लोकसभेतील भाजपचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी बावनकुळे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जगामध्ये भारताचा आदरयुक्त दबदबा निर्माण झाला आहे. मोदी यांच्या नेतृत्वाला सर्वाधिक पसंती मिळत आहे. राज्यामध्ये महायुती आहे. सगळ्यांच्या विचाराने शिवाजीराव आढळराव यांना शिरूर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. त्यामुळे आपली सगळ्यांची जबाबदारी वाढली आहे. शिवाजीराव आढळराव यांना सर्वाधिक मतांनी विजयी करण्याची जबाबदारी आपली सगळ्यांची आहे, अशा सूचना त्यांनी दिल्या. या मतदारसंघातील खासदार अमोल कोल्हे मतदारसंघात कधी फिरकले नाहीत. याउलट शिवाजीराव आढळराव यांनी मागील पाच वर्षांत मतदारसंघात जास्तीत जास्त कामे केली आहेत. दरम्यान, चंद्रशेखर बावनकुळे यांच्या बैठकीमुळे भोसरी व जुन्नर तालुक्यासह आंबेगाव, खेड, शिरूर, हवेली व हडपसरमधील भाजप कार्यकर्ते अधिक जोमाने कामाला लागणार असल्याने शिवाजीराव आढळराव यांना अधिक बळ मिळण्यास फायदा होणार आहे.

# शरद पवारांच्या बेरजेच्या राजकारणाला वेग

## आता अहिल्यादेवी होळकरांचे वंशज भूषणसिंह होळकर तुतारी हाती धरणार

पुणे । प्रतिनिधी





महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वाधिक पावसाळे पाहिलेला आणि मुरब्बी नेता असलेले शरद पवार लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर आपल्या अनुभवाचा पुरेपूर वापर करताना दिसत आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये शरद पवार (डहरीरव झुरी) हे आपल्या पक्षाची ताकद वाढवण्याच्यादृष्टीने त्यांच्या बेरजेच्या राजकारणाचा प्रभावीपणे वापर केला आहे. याचाच एक भाग म्हणून शरद पवार यांनी आता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या वंशजांना सोबत घेतले आहे. अहिल्यादेवी होळकरांचे वंशज असलेले भूषणसिंह होळकर हे लवकरच शरद पवार गटात प्रवेश करणार असल्याची माहिती आहे.

लोकसभा निवडणुकीत भूषणसिंह होळकर हे शरद पवार गटाचे स्टार प्रचारक असतील. तसेच भूषणसिंह होळकर यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदी वर्णी लागणार आहे. विशेष म्हणजे तीन वर्षांपूर्वी याच भूषणसिंह होळकर यांनी शरद पवार यांच्यावर टीकास्त्र डागले होते. मध्यंतरी जेजुरीतील अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याच्या लोकार्पणाचा वाद चांगलाच गाजला होता. त्यावेळी शरद पवार यांच्या हस्ते लोकार्पणाला विरोध करण्यात आला होता. तेव्हा भूषणसिंह यांनी, होळकरांच्या सातबाऱ्यावर पवार कुटुंबियांचा डोळा असल्याचा आरोप केला होता. मात्र, आता तेच भूषणसिंह होळकर हे शरद पवार गटात प्रवेश करणार आहेत. त्यामुळे शरद पवार यांनी आणखी एका विरोधकाला स्वत:च्या बाजूने वळवण्यात यश मिळवले आहे. यापूर्वी शरद पवार यांनी चंद्रराव तावरे, अनंत थोपटे आणि बारामतीमधील पवार कुटुंबीयाचे पारंपरिक विरोधक असलेल्या काकडे कुटुंबीयांची भेट घेऊन राजकीय शत्रुत्त्वाला तिलांजली दिली होती

# प्रचाराच्या धामधुमीत जनता वाऱ्यावर; प्यायलाही पाणी नाही

ओतूर । प्रतिनिधी

सद्य:स्थितीत ग्रामीण भागात गावोगाव यात्रा-जत्रांचा हंगाम सुरू आहे. ग्रामदैवत देवी-देवतांच्या यात्रेच्या परंपरेनुसार धार्मिक विधीसोबत मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. सोबतच यंदा लोकसभेच्या निवडणुकीचे वारे असल्याने नेते, पुढारी यात्रा-जत्रांना भेट देऊन प्रचार यंत्रणा राबवीत आहेत. मात्र, या सर्व धामधुमीत अनेक गावांत तीव्र उन्हाळ्यामुळे पाण्याचा गंभीर प्रश्न 'आ' वासून उभा आहे. त्याकडे मात्र कोणाचेच लक्ष नसल्याचे चित्र आहे. बहुतांश गावांमधून पशुपक्षी, जनावरे तहानलेली असून, गावकर्यांना देखील पिण्याचे व रोजच्या वापरासाठी लागणारे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. आदिवासी पट्ट्यातील महिला भगिनी हजारो फूट डोंगरखोरे उतरून एक हंडा पाणी जमवून व डोईवर घेऊन पुन्हा तितकेच कष्ट घेत घरी येताना दिसत आहेत. त्यातच शेतीक्षेत्र उघडे-बोडके झालेले पाहताना मनाला वेदना झाल्याशिवाय राहत नाहीत.

उत्तर पुणे जिल्ह्यातील काही गावांमध्ये ओढे, नाले, नद्या, विहिरी, तलाव, कूपनलिका कोरड्याठाक पडल्या आहेत, तर धरण क्षेत्रांनी तळ गाठायला सुरुवात केली आहे. ही आजची पाण्याची भीषणता पाहता गावोगावच्या यात्रेतील तमाशातील गाणी व निवडणुकीची फिरत्या गाडीवर भोंग्यातून वाजत असलेली गाणी तितकीशी समाधान देत नाहीत. त्यात शेतमालाचे पडलेले बाजारभाव, पिकांचे कमी गळीत अन् बिबट्यांची दहशत शेतकर्यांच्या पाचवीला पुजलेली दिसते. परिणामी, मतदारांमध्ये कमालीची उदासीनता दिसून येत आहे.

शिरूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक देखील भीषण पाणीटंचाईवर गाजणार आहे. अणे पठार भाग, पिंपरी पेंढार, गामुखवाडी, खामुंडी, डुंबरवाडी, कोपरे, मांडवे, पुताचीवाडी, जांभुळशी आदी गावांमध्ये पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

उपरोक्त काही गावांना पिंपळगावजोगा व चिल्हेवाडी धरण कालव्यापासून टाळण्यात आल्याने तेथे दुष्काळाला जाणीवपूर्वक आमंत्रण दिल्यासारखेच आहे. ज्या भागांत नागरिक पाण्यासाठी टाहो फोडीत आहेत, त्या भागांतील पाणी प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढणार्या उमेदवाराच्या पाठीशी मतदारराजा उभा राहणार हे अधोरेखित झाल्याचे बोलले जात आहे. केवळ गाणी वाजवून पाणी मिळणार का? असा खडा सवाल शेतकरी करू लागले आहेत. अद्याप पाऊस सुरू व्हायला दोन महिने बाकी आहेत. पिण्याचे पाणी कोण व कसे देणार, याचे उत्तर मतदारराजाला अपेक्षित आहे.

# धायरीत होणार समान पाणीवाटप; टंचाईग्रस्त रहिवाशांना मेअखेरपर्यंत वितरण

खडकवासला । प्रतिनिधी

सिंहगड रस्त्यावरील सर्वात अधिक लोकसंख्येच्या धायरी येथील ३० हजारांवर रहिवाशांना अखेर समान पाणीवाटप योजनेंतर्गत पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. योजनेंतर्गत मे अखेरपर्यंत प्रत्यक्ष पाणीवाटप सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी तीन फुटी जलवाहिन्या टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. धायरी येथील हायब्लीस सोसायटीजवळ समान पाणीवाटप योजनेंतर्गत पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे. मात्र, अनेक महिन्यांपासून काम मंदगतीने सुरू होते. पाणीटंचाईची समस्या दूर व्हावी यासाठी माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच आमदार भीमराव तापकीर यांनी याबाबत थेट विधिमंडळात शासनाचे लक्ष वेधले होते. तर आम आदमी पक्षाचे शहराध्यक्ष धनंजय बेनकर व नागरिकांनी सिंहगड रोड परिसरातील रखडलेल्या समान पाणीवाटप योजनेचे काम पूर्ण करण्याचे साकडे घातले होते. माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे म्हणाले, आरक्षित जागेवर पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे. ही योजना सुरू झाल्याने हजारो नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे.



समान पाणीवाटप विभागाचे उपविभागीय अभियंता नितीन खुडे म्हणाले, वडगाव जलशुद्धीकरण केंद्र ते धायरी येथील हायब्लिस सोसायटीपर्यंत जलवाहिन्या टाकण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. मे पर्यंत काम पूर्ण होईल आणि लगेच पाणीपुरवठा सुरू होणार आहे. सिंहगड रस्त्यावरील धायरी फाटा ते उंबर्या गणपती चौक तसेच पारी कंपनी, हायब्लिस सोसायटी परिसरातील तीस हजारांवर रहिवाशांना या योजनेचे पाणी मिळणार आहे. त्यामुळे या परिसरातील पाणीटंचाईची समस्या दूर होणार आहे.

# अखेर 'त्या' ज्यूस विक्रेत्याला एफडीएची नोटीस; बर्फात आढळला होता उंदीर

पुणे : : जुन्नर तालुक्यातील बेल्हे गावातील जय बजरंग कोल्ड ड्रिंक्स आणि ज्यूस बारमध्ये खाण्यायोग्य बर्फाच्या ब्लॉकमध्ये गोठलेला उंदीर आढळून आला होता. अन्न आणि सुरक्षा प्रशासनाने अन्न सुरक्षा आणि मानक कायदा २००६ आणि अन्न सुरक्षा आणि मानक नियम २०११ नुसार परवाना नसताना गेल्या चार वर्षांपासून अन्न सुविधा चालवणाऱ्या विक्रेत्याला नोटीस जारी केली आहे.



अन्न व औषध प्रशासनाने अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, हा विक्रेता भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण परवान्याशिवाय काम करत असल्याचे तपासात समोर आले आहे. रस आणि थंड पेये देण्यासाठी वापरलेल्या खाद्य बर्फात गोठलेल्या उंदराचा व्हिडीओ बुधवारी सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर अन्न आणि औषध प्रशासनाने चौकशी सुरू केली.

सहआयुक्त अर्जुन भुजबळ, सहायक आयुक्त एस. बी. कोडगिरे, अन्न सुरक्षा अधिकारी बी. ए. शिंदे, एस. एन. जगताप, ए. जी. गायकवाड यांनी छापा टाकला. अहमदनगरच्या निघोज गावातील एका कंपनीकडून बर्फाचे तुकडे खरेदी केल्याचे अधिकार्यांना आढळून आले. एफडीए पुणे टीमने शुक्रवारी अहमदनगर टीमला बर्फ निर्मिती कारखान्याची तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

कोडगिरे म्हणाले, 'सुमारे ३०० किलो खाद्य बर्फाचा साठा नष्ट केला आहे. आम्ही ज्यूस सेंटरमधून बर्फ आणि इतर खाद्यपदार्थांचे नमुने घेतले आहेत आणि ते विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवले आहेत.

# रायरीतील जमीन खरेदी-विक्रीस बंदी



भोर :: रायरी (ता. भोर) येथील शेतकर्यांना त्यांच्या जमिनीचे गट माहीत नसल्यामुळे कोणाचीही जमीन कोणीही कसत आहे. जोपर्यंत शेतकर्यांच्या सातबाराची नोंद रीतसर सापडत नाही तोपर्यंत गावच्या हद्दीतील जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार करण्यास बंदी करण्याचा ठराव ग्रामपंचायतीच्या वतीने भोर महसूल विभागास देण्यात आला. रायरेश्वर किल्ल्याच्या पायथ्याशी व निरा-देवघर धरणाच्या कडेला रायरी हे निसर्गरम्य गाव भोरपासून २५ किलोमीटर अंतरावर आहे.

धरण होण्यापूर्वी या भागात कोणीही जमीन खरेदी-विक्रीचा व्यवहार करीत नव्हते. परंतु, धरण झाल्यानंतर मुंबई, पुणे व अन्य शहरांतील अनेकांनी जमिनी विकत घेतल्या. अनेकांनी एजंटमार्फत कवडीमोल भावाने जमिनींची खरेदी केली. परिणामी, अनेक शेतकर्यांकडे आता जमिनी शिल्लक नाहीत. कवडीमोल भावाने घेतलेल्या जमिनी विकसित करून पुन्हा चढ्या भावाने विकली जात आहेत. त्यामुळे यापुढे राहिलेल्या जमिनीची खरेदी-विक्री होऊ नये, यासाठी रायरी ग्रामस्थांनी यापुढे जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार करण्यास बंदी करण्याचा निर्णय घेतला. याबाबतचे फलक गावात जागोजागी लावण्यात आले आहेत.

निरा-देवघर धरण परिसरातील हिरडोशी, पर्हर, निगुडघर, साळव, वेणुपुरी, कोंढरी, आशिंपी, शिरगाव अन्य गावे या धरणात गेली आहेत. धरणामुळे विस्थापित झालेले अनेक शेतकरी उर्वरित डोंगरमाथ्याची जमीन दलालांच्या मध्यस्थीने विकत आहेत. परिसरातील ७० टक्के जमिनीची विक्री झाली आहे. उर्वरित जमीन तरी कोणी विकू नये, असा निर्धार ग्रामस्थांनी केला असून, त्यांच्या या धाडसी निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स असोसिएशनच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

पुणे । प्रतिनिधी




महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती नेहरूनगर येथिल कोर्टात उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी प्रमुख उपस्थिती म्हणून पिंपरी न्यायालयाचे न्यायाधीश श्री.व्ही.एन. गायकवाड साहेब, निवृत्त न्यायाधीश श्री. बी.एन. वाघ साहेब, कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड.सुनिल कडुसकर, मा.अध्यक्ष ॲड.नाना रसाळ, अध्यक्षा ॲड.प्रमिला गाडे, उपाध्यक्ष ॲड. गोरख कुंभार, महिला सचिव ड. वर्षा तिडके यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करून आला तसेच यावेळी भारतीय राज्यघटनेच्या प्रतींचे वाटप करण्यात आले. यावेळी जेष्ठ ॲड.बी.के. कांबळे,ॲड.अरुण खरात मामा, ॲड.पि.एस.कांबळे ॲड.संभाजी बवळे, ॲड.संभाजी वाघमारे, ॲड.सुनील माने,ॲड. नारायण थोरात,ॲड. राज जाधव, यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनप्रवासावर व्याख्यान देऊन विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी ॲड.मुकुंद ओव्हाळ, ॲड.नितीन कांबळे, ॲड.सागर अडागळे, ॲड.वाळके, ॲड.प्रविण जगताप,ॲड.मिलिंद कांबळे, ॲड.श्रीराम गालफाडे, सदस्य ॲड.जयेश वाघचौरे, ॲड.सुर्यकांत शिंदे,ॲड. प्रशांत बचुटे,ॲड. एश्वर्या शिरसाठ आदी वकील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन असोसिएशन चे सदस्य ॲड. विशाल पौळ यांनी केले व आभार प्रदर्शन ॲड.तेजस चवरे यांनी केले.

# वन्यप्राणी, पशू-पक्ष्यांसाठी टँकरने पाणी : वन विभाग

टाकळी हाजी : : शिरूर तालुक्यात उन्हाळ्याच्या उष्णतेने कहर केला आहे. मानवांबरोबरच वन्यप्राणी, पशू-पक्ष्यांचे पाण्याअभावी हाल होत आहेत. भटकंती करताना प्राणी विहिरीत पाणी पिण्यासाठी जाताना दिसत आहेत व त्यामुळे त्यांचा जीव धोक्यात येत आहे. अशा काही घटना घडल्या आहेत. वन्यप्राणी, पशुपक्ष्यांची पाण्यासाठी होणारी भटकंती थांबविण्यासाठी वन विभागाच्या वतीने टँकरद्वारे पाणवठ्यांमध्ये नियमित पाणीपुरवठा करण्यात येत आहे. चिंचोली मोराची या परिसरात मोठ्या प्रमाणात वनक्षेत्र असून, या ठिकाणी अनेक प्रकारचे कोल्हे, लांडगे, तरस, ससे आदी वन्यप्राण्यांसह मोर व इतर पशू-पक्ष्यांचा अधिवास आहे. सध्या उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने या भागात असणारे ओढे, नाले,



पाणवठे आटू लागले आहेत. त्यामुळे पाण्याच्या शोधासाठी वन्यप्राणी, पशुपक्ष्यांची भटकंती वाढत आहे.

पाण्याचा शोध घेत फिरताना अनेकदा मानवाबरोबरच संघर्ष करावा लागत आहे. तसेच त्यांना विहिरीत पडून जिवासही मुकावे लागत आहे. हे प्रकार थांबविण्यासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी प्रताप जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल गणेश पवार, वनरक्षक नारायण राठोड व वनमजूर हनुमंत कारकूड हे वन क्षेत्रात, तसेच लगतच्या भागातील पाणवठ्यांवर काही दिवसांच्या अंतराने २० हजार लिटरच्या टँकरने पाणी टाकण्याचे काम करीत आहेत. ते पाणवठे काठोकाठ भरण्यात येत आहेत. हे पाणवठे आटणार नाहीत, याची दक्षता वन विभागाकडून घेतली जात आहे. त्यामुळे वन्यप्राणी, पशू-पक्ष्यांची पाण्यासाठी होणारी वणवण थांबण्यास मदत झाली आहे. दरम्यान, वन्यप्राण्यांसह पशू-पक्ष्यांसाठी अन्न व पाण्याची आपापल्या परीने सोय करून वन्यप्रेमींनी खारीचा वाटा उचलावा, असेच आवाहन वन विभागाकडून करण्यात आले आहे.